SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १०.०८.२०२६ | अंक नं. ११२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी
खरेदीवर पॉईंट
पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹ 50000/- सोने खरेदीवर
₹ 20000/- चांदी खरेदीवर
₹ 5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹ 5000/- फॉमिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹ 999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु


# मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान मृत्यू; नगर शहरात कडकडीत बंद; सकल हिंदू समाजाच्यावतीने रॅली, मोर्चाद्वारे निषेध



**भिंगारमध्ये पाळला कडकडीत बंद**

मुकुंदनगरमधील हल्ल्यात प्राण गमावलेले महापालिकेचे कंत्राटी कर्मचारी हे भिंगार येथील रहिवासी असल्यामुळे १० ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने भिंगार येथेही बंदचे आवाहन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर भिंगारमध्येही कडकडीत बंद पाळण्यात आला. भिंगारमधील बाजार तळावरील शंभर टक्के दुकाने बंद ठेवण्यात आली होती. (छाया-विजय मते)



नगर शहरात १० ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाजाने बंदची हाक दिल्यानंतर सर्व व्यापाऱ्यांनी कडकडीत बंद पाळला. शहरातील कापड बाजार, सराफ बाजार, गंज बाजार, मोची गल्ली, डाळ मंडई, चितळे रोड, दिल्ली गेट, माळीवाडा हे सर्व परिसर पूर्णपणे बंद होते. (छाया : धनेश कटारिया)

नगर - मुकुंदनगर परिसरात झालेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महापालिका कर्मचारी धीरज रजपूत (परदेशी) यांचा रविवारी (दि. ९) उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर सकल हिंदू समाजात संताप पसरला. आ. संग्राम जगताप, आ. अक्षय कर्डिले, हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि परदेशी कुटुंबीय आक्रमक झाले. सकल हिंदू समाजाच्यावतीने शहरात बंदची हाक दिली होती. शहरात ९ व १० ऑगस्ट रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील मुख्य बाजारपेठेसह पाईपलाईन, सावेडी, बोल्हेगाव फाटा भागातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून या घटनेचा निषेध नोंदविला.

परदेशी हे महापालिकेच्या पथदिवे दुरूस्तीच्या कामासाठी ७ ऑगस्ट रोजी मुकुंदनगरमधील दर्गा दायरा परिसरात गेले होते. त्यावेळी त्यांच्यावर काही इसमांनी हल्ला केला. या हल्ल्यात परदेशी गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू होते. अखेर ९ ऑगस्ट रोजी दुपारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. परदेशी यांच्या मृत्यूनंतर शहरात हिंदूत्ववादी कार्यकर्ते आक्रमक झालेले दिसले. अनेक कार्यकर्त्यांनी शहरात बंदची हाक दिली. तसेच काहींनी दुकाने, आस्थापना बंद करण्याचे आवाहन केल्यानंतर पोलिसांकडून काही तरुणांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी आ. संग्राम जगताप, आ. अक्षय कर्डिले यांनी याप्रकरणी तीव्र संताप व्यक्त करीत शहरात बंदचे आवाहन केले.

दरम्यान, धीरज परदेशी यांचे शवविच्छेदन छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रूग्णालयात इन-कॅमेरा करावे, ज्या ठिकाणी हल्ला झाला त्याच ठिकाणी अंत्यविधी करावा आणि आरोपींची अनधिकृत घरे प्रशासनाने तातडीने जमीनदोस्त करावीत, अशा मागण्या परदेशी यांच्या कुटुंबीयांनी केल्या आहेत. रविवारी सायंकाळी त्यांचा मृतदेह घाटी येथील रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता. सोमवारी, १० ऑगस्ट रोजी त्यांचा मृतदेह नगरमध्ये आणण्यात आला.

परदेशी यांच्यावर हल्ला करणाऱ्या एका संशयिताला पोलिसांनी हल्ला झाला त्याच दिवशी ताब्यात घेतले होते. त्यानंतर पसार असलेल्या संशयित पाचजणांना हैदराबाद येथून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेतील सर्व आरोपींवर कठोर कारवाई करण्यात येईल. मात्र, शहरातील कायदा सुव्यवस्था कोणीही धोक्यात आणण्याचा प्रयत्न करु नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

### मनपा कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरु; सर्व सेवा ठप्प

मनपा कर्मचारी धीरज परदेशी यांच्या मृत्यूप्रकरणी सर्व कर्मचाऱ्यांनी १० ऑगस्टपासून बेमुदत संप सुरु केला आहे. शुक्रवारपासून मुकुंदनगरमधील सर्व सेवा बंद आहेत. शुक्रवारी ज्यावेळी हल्ला झाला, त्यावेळी तेथील एकही नागरिक मदतीला आला नाही. पालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांनीच धीरज यांना उचलून दवाखान्यात नेले. पण मुकुंदनगरमधील एकही नागरिक साधे त्याला उचलण्यासाठी देखील मदतीला आला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठा संताप आहे. एकतर कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळावे आणि महापालिकेकडून नुकसानभरपाई मिळावी. तसेच जोपर्यंत सर्व आरोपींना अटक होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई केली जात नाही. तोपर्यंत एकही कर्मचारी कामावर येणार नाही, असा पवित्रा कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. १० ऑगस्ट कर्मचाऱ्यांनी शहरातील पाणी पुरवठा वगळता इतर सर्व सेवा बंद ठेवून बेमुदत संप पुकारला आहे. जोपर्यंत संघटनेच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हा संप सुरुच राहणार आहे, असे महापालिका कर्मचारी युनियनच्यावतीने सांगण्यात आले. यावेळी कामगार युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, सेक्रेटरी आनंदराव वायकर, शेखर देशपांडे, विजय कोतकर, सोनू चौधरी, सतीश ताठे, विकास गीते, राजू लयचेट्टी, बाळासाहेब विधाते आदींसह मनपा कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान मनपा कामगार युनियनने काम बंद आंदोलन सुरू केल्यामुळे आयुक्त यशवंत डांगे यांना स्वतः महापालिकेचे गेट उघडावे लागले.

### रिक्षाचालकांविरोधात आवाज उठविल्यानेच परदेशींची हत्या : चव्हाण

भिंगार परिसरात येणारी अहिल्यानगर महापालिकेच्या शहर बससेवेची बसस्थानक ते आलमगीर ही एएमटी बंद झाल्याने भिंगार येथील काही संवेदनशील भागात ठराविक समाजातील रिक्षाचालकांची मुजोरी भयंकर वाढलेली आहे आणि याच मुजोरीच्या विरोधात मयत धीरज परदेशी यांनी मागे आवाज उठवला होता. या पार्श्वभूमीतूनच त्यांची हत्या करण्यात आली. जर महापलिकेने भिंगार रूटवरील बससेवा बंद केली नसती तर आज कदाचित धीरज परदेशी जीवंत असते. त्यामुळे या हत्येला जितके जबाबदार मारेकरी आहेत, तितकेचं जबाबदार महापालिकेचे निर्ढावलेले प्रशासन देखील आहे. महापालिकेचे कंत्राटी कर्मचारी मयत धीरज परदेशी यांच्या पत्नीला महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी देऊन महापालिकेने

(पुढील मजकूर व छायाचित्रे पान २ वर)


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री दिगंबर मारूती साळुंके यांचे पुर्वज नामे कै. भवानी साळुंके उर्फ घिसाडी, कै. भैरू (बहिरू) भवानी साळुंके उर्फ घिसाडी व कै. मारूती भैरू साळुंके उर्फ घिसाडी यांच्या मालकीच्या मिळकती अहिल्यानगर (अहमदनगर) येथील कॅन्टॉन्मेंट क्षेत्र, नगर- औरंगाबाद रोड, कोठला, सावेडी, मंगलगेट, कोंडीमामा चौक, माळीवाडा, केडगाव, नालेगाव, राहुरी - घोडेगाव रोड व इतर ठिकाणी, तसेच पुणे जिल्हयातील शिरूर या गावामध्ये असून सदरील मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरील मिळकती खालील फोटोंमध्ये दर्शविलेले इसम नामे १) श्री वसंत सहादू साळुंके, २) श्री सुरेश सहादू साळुंके, ३) श्री चंद्रशेखर किसन साळुंके व ४) श्री नितीन किसन साळुंके परस्पर खोटयानाटया कागदपत्रांच्या आधारे एकटे मालक असल्याचे भासवून हडप व गिळंकृत करून तिऱ्हाईत इसमांची दिशाभूळ करून आमचे अशिलांचे परस्पर हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याकामी आमचे अशिलांनी सदर इसमांविरूद्ध पोलीसांत फिर्याद अर्ज दिला होता. सदर प्रकरणी सदर फोटोंमध्ये दर्शविलेले इसम पोलीस स्टेशनमध्ये हजर होऊन त्यांनी सदर मिळकतींबाबत कुठलाही व्यवहार केला नसल्याचा पोलीसांना जबाब दिला आहे. या उपर सदर मिळकतींबाबत खालील इसमांशी कोणीही कुठलाही व्यवहार केला असल्यास सदरचा व्यवहार हा मूळत: बेकायदेशीर राहिल. त्यामुळे खालील इसमांशी कोणीही करार, मदार, दान, घान, लिज, लिन, ट्रान्स्फर, खरेदी-विक्री, कुलमुखत्यारपत्र, विकसनकरारनामा इत्यादी करू नये. जर कोणी वरील इसमांशी आमचे अशिलांचे संमती शिवाय कुठलाही व्यवहार व करारमदार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार बेकादेशीर व रद्द समजण्यात येईल. सबब सदरील जाहीर नाटीस दिली असे.

दि: १०/०८/२०२६ , अहिल्यानगर


श्री.सुरेश सहादू साळुंके


श्री.नितीन किसन साळुंके


श्री.चंद्रशेखर किसन साळुंके


श्री.वसंत सहादू साळुंके

अ‍ॅड. मयुर दिगंबर साळुंके
फ्लॅट नं. ८, सत्यराज क्लासिक बिल्डींग, सिटीएस २८९, शुकवारपेठ, पुणे ४११००२.
मोबाईल ९१५८८७४७३९





स्व. राजाराम लक्ष्मण दुलम
स्वर्गवास दि. १०/०८/२०१८
।। आठवे पुण्यस्मरण ।।
सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे, शिकवण आम्हाला दिली अविरत सेवेची,
कर्तव्य आम्हाला शिकवले स्व:कष्टाचे, आदर्श आम्हाला दिले सद्‌विचारांचे..
आपली शिकवण हिच सोबती आमची जन्मजन्मांतरीची...
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण
श्रध्दांजली
* दुःखांकित *
चंद्रकांत लक्ष्मण दुलम
लक्ष्मण राजाराम दुलम (मुलगा) । रमेश राजाराम दुलम (मुलगा)
समस्त दुलम परिवार..
डि.चंद्रकांत SINCE 1984 चितळे रोड, अहिल्यानगर
DC CAFE सावेडी, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com



बेमुदत संपाची हाक देत महापलिके समोर निदर्शने करताना मनपाचे कर्मचारी युनियनचे पदाधिकारी.



मुकुंदनगरकडे जाणारा रस्ता पोलिसांनी बॅरिकेटस् लावून बंद केला होता.



शहरात हिंदू संघटनेने मोटारसायकल रॅली काढून व्यापाऱ्यांना बंदचे आवाहन केले. ही रॅली पूर्ण शहरातून फिरली. (छाया : धनेश कटारिया)

# नगर शहरात कडकडीत बंद; सकल हिंदू समाजाच्यावतीने रॅली, मोर्चाद्वारे निषेध

(पान १ वरुन)

त्यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा अशी मागणी मनसेचे भिंगार शहरप्रमुख विकास चव्हाण यांनी केली आहे.

### मुकुंदनगरचे सर्व मुख्य रस्ते केले बंद

मयत धीरज परदेशी यांच्यावर ज्या ठिकाणी हल्ला झाला, त्याच त्याच दर्गा दायरा परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात यावेत, अशी मागणी मयत धीरज यांच्या पत्नीने केली आहे. या पार्श्वभूमीवर मुकुंदनगर परिसरात पोलिसांनी कडेकोट सुरक्षा बंदोबस्त तैनात केला असून, परिसरातील सर्व प्रमुख रस्ते बॅरिकेटिंग करून बंद करण्यात आले आहेत. तसेच पोलीस प्रशासनाने मुकुंदनगर परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. प्रत्येक हालचालीवर पोलीस बारकाईने लक्ष ठेवून आहेत. यामुळे परिसराला अक्षरशः पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे.

### पोलीस अधीक्षकांकडून पाहणी

अहिल्यानगर महानगरपालिकेतील कर्मचारी धीरज परदेशी यांच्या मृत्यू प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शहरातील विविध संवेदनशील भागांची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील भाग, बाजारपेठ परिसराची पाहणी करून तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेतली. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविणे, संवेदनशील भागात गस्त वाढविणे, नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारची अफवा पसरू न देणे तसेच परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवणे, अशा विविध सूचना पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.शहरातील नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी तसेच कोणतीही संशयास्पद बाब निदर्शनास आल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



मनपा कर्मचारी युनियनने संप पुकारल्यामुळे आयुक्तांना स्वतः महापालिकेचे गेट उघडावे लागले. (छाया : लहू दळवी)

# मुकुंदनगर हल्ल्यातील आरोपींचा हैदराबादपर्यंत थरारक पाठलाग

## एलसीबीने २४ तासांत तिघांना पकडले, पलायनास मदत करणारे दोघेही ताब्यात

नगर – मुकुंदनगर येथील दर्गा दायरा परिसरात पथदिव्याच्या दुरूस्तीचे काम करण्यासाठी गेलेल्या महापालिका कर्मचारी धीरज कचरूसिंग रजपूत (परदेशी) यांच्या खूनप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलिसांनी तत्पर कारवाई केली. पसार झालेल्या तीन मुख्य आरोपींच्या मुसक्या अवघ्या २४ तासांत हैदराबादमध्ये आवळण्यात त्यांना यश आले. आरोपींना हैदराबादला पळून जाण्यास मदत करणार्या आणखी दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यापूर्वी एका आरोपीला अटक करण्यात आली होती. त्यामुळे या प्रकरणातील पोलिसांच्या कारवाईतील आरोपींची संख्या सहा झाली आहे.

फिर्यादी अक्षय मुळे हे धीरज परदेशी यांच्यासह सहकार्यांना घेऊन दर्गा दायरा परिसरात पथदिव्याच्या दुरूस्तीचे काम करण्यासाठी गेले होते. त्यावेळी मेहराज अस्लम सय्यद, सिराज अस्लम सय्यद, मुस्तकीम अस्लम सय्यद, युनूस शेख आणि अन्य दोन ते तीन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्लयात धीरज परदेशी गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच ९ ऑगस्ट रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना पसार आरोपींचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने विशेष तपास पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू केला.

पोलिसांनी बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यासह तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. तपासादरम्यान मुख्य आरोपी हैदराबादमध्ये लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खात्री होताच स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तातडीने हैदराबादकडे रवाना झाले. हैदराबाद शहर पोलिसांच्या कमिशनर टास्क फोर्स आणि खैरताबाद झोनच्या मदतीने पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. मुस्तकीम ख्वाजामिया सय्यद (वय २०), मेहराज इब्राहिम सय्यद (वय २२) आणि सिराज इब्राहिम सय्यद (वय २१, तिघेही रा. आलमगीर मदरशाजवळ, भिंगार) यांना ताब्यात घेण्यात आले.



मनपा कर्मचाऱ्यावर मुकुंदनगर मध्ये हल्ला करणाऱ्या आरोपींना आणि त्यांना पलायनासाठी मदत करणाऱ्या दोघांना पकडल्या नंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलिसांच्या चौकशीत आरोपींनी हल्लयात सहभागाची कबुली दिल्याचे सांगण्यात आले. हल्लयानंतर छत्रपती संभाजीनगर येथून रेल्वेने हैदराबादला गेल्याची माहितीही त्यांनी पोलिसांना दिली.

दरम्यान, आरोपींना शहराबाहेर पळून जाण्यास कोणी मदत केली, याचा तपास सुरू असताना ख्वाजामियाँ उर्फ अकरम याकुब सय्यद (वय ५२, रा. आलमगीर) आणि वसीम रहिम सय्यद (वय ४७, रा. वाबळे कॉलनी, फकीरवाडा, मुकुंदनगर) यांनी आरोपींना हैदराबादला पळून जाण्यास मदत केल्याचे तपासात समोर आले. त्यानंतर पोलिसांनी या दोघांनाही ताब्यात घेतले.

### वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेगवान तपास

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि नगर शहर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, तसेच अंमलदार संदीप पवार, विजय ठोंबरे, फुरकान शेख, गणेश धोत्रे, शाहीद शेख, राहुल डोके, रणजीत जाधव, प्रशांत राठोड, राहुल व्दारके, रमिझराजा आतार, अरूण मोरे, अभिजीत अरकल यांच्यासह शिर्डी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कल्पेश चव्हाण आणि पोलीस अंमलदार कैलास राठोड सहभागी झाले होते.

## रेखाचित्रकार श्रीधर अंभोरे यांचे निधन



नगर – राज्यासह देशपातळीवर आपल्या स्वतंत्र चित्रशैलीने ठसा उमटविणारे ज्येष्ठ रेखाचित्रकार श्रीधर अंभोरे (वय ८०) यांचे १० ऑगस्ट रोजी पहाटे जालना येथे निधन झाले.

श्रीधर अंभोरे यांचे चार दशकांहून अधिक काळ अहिल्यानगरमध्ये वास्तव्य होते. नगर हीच त्यांची कर्मभूमी राहिली. आपल्या कुंचल्यातून विविध विषयांना कलात्मक अभिव्यक्ती देताना त्यांनी रेखाचित्रकलेला वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या चित्रांमध्ये केवळ कलात्मक सौंदर्य नव्हे, तर सामाजिक जाणिवा, मानवी जीवन, संस्कृती आणि सभोवतालच्या वास्तवाचे दर्शन घडत असे. त्यामुळे त्यांच्या कलाकृतींना रसिकांकडून मोठी दाद मिळाली.

त्यांच्या पार्थिवावर १० ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता जालना येथील छत्रपती संभाजीनगर रोडवरील रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# एमडी ड्रग्स प्रकरणातील पसार आरोपीला पुणे जिल्ह्यात पकडले

नगर – एमआयडीसी पोलिसांनी पकडलेल्या एमडी ड्रग्स प्रकरणातील संशयित आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे जिल्ह्यातील करडे (ता. शिरूर) येथून ताब्यात घेतले. तुषार उर्फ नाना अंकुश तांबे (वय ३१, रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) असे ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

एमआयडीसी पोलिसांनी राजस्थान येथील तरूणाकडून ड्रग्स जप्त केले होते. कारवाईदरम्यान एक संशयित पसार झाला होता. दरम्यान, जिल्ह्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांतील फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अधिकारी व कर्मचार्यांचे पथक तयार करून फरार आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार बाळासाहेब गुंजाळ, मनोज साखरे, रोहित मिसाळ, प्रशांत राठोड व प्रताप देवकाते यांच्या पथकाने जिल्ह्यातील अभिलेखावरील फरार व पाहिजे आरोपींचा शोध सुरू केला होता. दरम्यान, ८ ऑगस्ट रोजी पथक आरोपींचा शोध घेत असताना या गुन्ह्यातील आरोपी तुषार उर्फ नाना तांबे हा पुणे जिल्ह्यातील करडे येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खात्री करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने करडे येथे जाऊन तुषार तांबे याचा शोध घेतला. त्याला ताब्यात घेतल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यातील गुन्ह्याच्या अभिलेखावर तो पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.



एमडी ड्रग्स प्रकरणातील पसार आरोपीला पुणे जिल्ह्यात पकडल्या नंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## जयप्रकाश बोरा यांचे दु:खद निधन



नगर – येथील नक्षत्र लॉन मागे, सन्मनी बालाजी कॉलनी येथील रहिवासी जयप्रकाश (बाबूशेठ) दौलतराम बोरा (वय ८०) यांचे १० ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ भाऊ, नातवंडे असा परिवार आहे. धीरेंद्र व धीरज बोरा यांचे ते वडील होत तर जवाहर बोरा (इचलकरंजी) यांचे बंधू होत. करण व निखिल यांचे ते आजोबा होते.

### गुंडेगावचे माजी सरपंच

## हरिश्चंद्र कोतकर यांचे दु:खद निधन



नगर – अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगावचे माजी सरपंच हरिश्चंद्र सतुजी कोतकर उर्फ आबा (वय ८६) यांचे १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर गुंडेगाव स्मशानभूमी येथे ४ वाजता अंतिम संस्कार करण्यात आले.

मा.जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ पाटील यांचे ते मामा होते. हरिचंद्र आबा यांचा स्वभाव सुसंस्कृत व मनमिळावू होता. त्यांनी अनेक लोकांना सहकार्य केलेले आहे. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. सर्वांशी मिळून मिसळून असत. गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ यांचे निस्सिम भक्त होते. त्यांच्या दुःखद निधनाने कोतकर परिवारांवर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे.

# परदेशी यांच्या कुटुंबियांना मनपाने २५ लाखांची आर्थिक मदत करावी

## गणेश भोसले यांची महापौर गाडे व आयुक्त डांगे यांच्याकडे मागणी

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी स्वर्गीय धीरज कचरुसिंग परदेशी यांच्यावर मुकुंदनगर परिसरात कामावर असताना समाजकंटकांकडून प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. या घटने मुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून, घरातील कर्त्या युवकाचे निधन झाल्याने कुटुंबाचा प्रमुख आधारच हरपला आहे. त्यामुळे स्वर्गीय धीरज परदेशी यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने तातडीने २५ लाख रुपयांची आर्थिक मदत करावी, अशी मागणी माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केली.

याबाबत त्यांनी महापौर ज्योतीताई गाडे व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदन सादर केले. स्वर्गीय धीरज परदेशी हे महानगरपालिकेच्या विद्युत विभागात कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. शहरातील नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देताना कर्तव्य बजावत असतानाच त्यांच्यावर हा जीवघेणा हल्ला झाला. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर महानगरपालिकेने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून या कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे गरजेचे असल्याचे गणेश भोसले यांनी निवेदनात म्हटले आहे.

घरातील कर्त्या व्यक्तीचे अचानक निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कुटुंबाच्या भविष्यातील गरजा, शिक्षण, दैनंदिन खर्च तसेच इतर आर्थिक जबाबदाऱ्या लक्षात घेता महानगरपालिकेने तातडीने २५ लाख रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महानगरपालिका कर्मचारी शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य यांसह विविध नागरी सुविधा देण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत काम करतात. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्याचा मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, अशा परिस्थितीत त्यांच्या कुटुंबीयांना आधार देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे स्वर्गीय धीरज परदेशी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देऊन त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी गणेश भोसले यांनी केली.

# पुणे-नगर प्रवासात शिवाई बसमधून महिलेचे ६६ हजारांचे दागिने लांबवले

नगर – पुण्याहून अहिल्यानगरकडे येणाऱ्या शिवाई बसमधून प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या बॅगेतील ६६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रावेत (जिल्हा पुणे) येथील रहिवासी असलेल्या फिर्यादी सौ. मनीषा विश्वास कुलकर्णी (वय ५४) या ६ ऑगस्ट रोजी आपल्या मुलीसह अहिल्यानगर येथील भावाकडील कार्यक्रमासाठी निघाल्या होत्या. प्रवासासाठी त्यांनी आपले सोन्याचे दागिने एका छोट्या पर्समध्ये ठेवून ती पर्स मोठ्या बॅगेत सुरक्षित ठेवली होती. त्यानंतर त्या शिवाजीनगर येथून पुणे ते तारकपूर धावणाऱ्या शिवाई बसमध्ये बसल्या.

दुपारी २ वाजेच्या सुमारास सुपा येथील सुजय हॉटेलजवळ बस चहासाठी थांबली होती. त्यानंतर दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास बस तारकपूर बसस्थानकावर पोहोचली. तेथे गाडीतून उतरताना फिर्यादीने बॅग तपासली असता बॅगेतील दागिन्यांची पर्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये ५० ग्रॅम वजनाचे ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे पट्टी मंगळसूत्र आणि ५ ग्रॅम वजनाचे ६ हजार रुपये किमतीचे कानातील सोन्याचे झुमके असा एकूण ६६ हजार रुपयांचा ऐवज आहे. बसस्थानकावरील कॅमेऱ्यांची पाहणी केल्यानंतर दागिने चोरीला गेल्याची खात्री पटल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

या प्रकरणी फिर्यादी सौ. मनीषा विश्वास कुलकर्णी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस अंमलदार लोणारे करत आहेत.

## राधाकृष्ण निर्मळ यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील जुने तहसिल कार्यालय जवळ, वॉर्ड नं.१, संत गाडगेबाबा उद्यान मागील रहिवासी पीआरओ राधाकृष्ण (निशिकांत) सुधाकर निर्मळ (वय ६०) यांचे १० ऑगस्ट रोजी सकाळी ६:३० वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १० ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. नंदकिशोर, हेमंत, चंद्रकांत व सखाराम निर्मळ यांचे ते बंधू तर चि.निरज निर्मळ यांचे वडील होत.

# संरक्षण देता येत नसेल तर सरकारने नागरिकांना बंदुका द्याव्यात : किरण काळे

नगर – अहिल्यानगर शहराची मर्डर सिटी होण्यामागे सरकार आणि पोलीस प्रशासनाचे अपयश असल्याचा आरोप करत ठाकरे शिवसेनेने दोषींना फासावर लटकवावे तसेच सरकारला अहिल्यानगरकरांना संरक्षण देता येत नसेल तर सरकारने नगरकरांना स्वतःच्या संरक्षणासाठी बंदुका द्याव्यात, अशी मागणी अहिल्यानगर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

याबाबत काळे यांनी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक यांना लेखी निवेदन पाठविले आहे, या निवेदनात म्हटले आहे, अहिल्यानगर शहरातील धीरज परदेशी या युवकाच्या हत्येच्या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून उर्वरित फरार आरोपींना तात्काळ अटक करावी. तसेच या गुन्ह्यामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्यालाही तात्काळ अटक करावी. या प्रकरणाचा तपास केवळ प्रत्यक्ष आरोपींपुरता मर्यादित न ठेवता, गुन्ह्याचे पूर्वनियोजन, कटकारस्थान तसेच आरोपींचे परस्पर संपर्क तपासण्यात यावेत. यासाठी सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल कॉल रेकॉर्ड, डिजिटल पुरावे, आर्थिक व्यवहार आणि अन्य वैज्ञानिक पुराव्यांची सखोल तपासणी करावी. तपास जलदगतीने पूर्ण करून सक्षम न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करावे. तसेच प्रकरण जलदगतीने चालविण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करून ज्येष्ठ व अनुभवी विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती करावी, अशी ठाकरे शिवसेनेने मागणी केली आहे.

धीरजसिंग परदेशी याच्या कुटुंबीयांना न्याय मिळणे हीच सर्वांत महत्त्वाची बाब आहे. या प्रकरणातील कोणताही दोषी अथवा पडद्यामागील सूत्रधार कायद्याच्या कक्षेतून सुटता कामा नये. तपास निष्पक्ष, जलद आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या थेट देखरेखी खाली व्हावा, अशी मागणी काळे यांनी केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### राखावी हातांची स्वच्छता

आपले हात दिवसभरात नकळत अनेक दूषित गोष्टींच्या संपर्कात येतात. त्यावर जमा झालेले सूक्ष्म जंतू जेव्हा आपण तोंडाला किंवा नाकाला लावतो, तेव्हा अतिसार, टायफॉइड, सर्दी-खोकला आणि डोळ्यांचे संसर्ग यांसारखे आजार शरीरात घर करतात. म्हणूनच, हातांची स्वच्छता राखणे ही निरोगी आयुष्याची पहिली ढाल आहे. खासकरून जेवणापूर्वी, अन्न बनवण्यापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर आणि बाहेरून घरी आल्यावर हात धुणे अनिवार्य आहे. फक्त पाण्याने हात ओले न करता, कमीत कमी २० सेकंद साबण लावून तळहात, बोटांमधील जागा, नखे आणि मनगट नीट घासून स्वच्छ करावेत. पाणी उपलब्ध नसल्यास चांगल्या सॅनिटायझरचा वापर करावा. हात धुतल्याने निम्म्याहून अधिक आजारांचा धोका टळतो. ही एक साधी आणि सोपी सवय आपल्या कुटुंबाला आजारपणापासून दूर ठेवून दीर्घायुष्य देते.

## पाककला

### गाजर हलवा टार्ट

**साहित्य : टार्ट बेससाठी :** बिस्किट चुरा १ कप (डायजेस्टिव्ह किंवा पार्ले-जी), वितळलेले बटर ३ चमचे.

**गाजर हलव्यासाठी :** किसलेले लाल गाजर २ कप, दूध १ कप, साखर १/२ कप, मावा किंवा मिल्क पावडर १/४ कप, तूप २ चमचे, वेलची पावडर १/२ चमचा, बारीक चिरलेले काजू-बदाम १ चमचा सजावटीसाठी: पिस्त्याचे तुकडे आणि सुक्या गुलाबाच्या पाकळ्या.

**कृती :** प्रथम एका भांड्यात बिस्किट चुरा आणि वितळलेले बटर एकत्र मिक्स करा. टार्ट मोल्डमध्ये (किंवा लहान वाट्यांमध्ये) हे मिश्रण दाबून बसवा आणि १०-१५ मिनिटे फ्रिजमध्ये सेट होण्यासाठी ठेवा. कढईत २ चमचे तूप गरम करून त्यात किसलेले गाजर ४-५ मिनिटे मंद आचेवर परतून घ्या. नंतर त्यात दूध घालून गाजर मऊ होईपर्यंत शिजवा. दूध आटल्यावर साखर, मावा (किंवा मिल्क पावडर) घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत परता. शेवटी वेलची पावडर आणि काजू-बदाम घालून गॅस बंद करा व हलवा थंड होऊ द्या. फ्रिजमधून टार्ट बेस बाहेर काढा. त्या टार्ट बेसवर तयार थंड झालेला गाजर हलवा चमच्याने व्यवस्थित पसरवून भरा. वरून पिस्त्याचे तुकडे आणि गुलाबाच्या पाकळ्या लावून सजवा. तयार गाजर हलवा टार्ट थंड किंवा रूम टेम्परेचरवर सर्व्ह करा.

## वास्तू

### पायऱ्यांखालील जागा

* घरातील अतिरिक्त कपडे किंवा वेळोवेळी लागणारे सामान ठेवण्यासाठी पायऱ्यांखालील जागेत लाकडी कपाट किंवा वॉर्डरोब तयार करता येतो.

* जर पायऱ्या घराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर नसतील, तर त्याखाली बंद स्वरूपातील बूट-चप्पलांचे रॅक ठेवता येते. मात्र, चप्पल-बूट उघड्यावर विखुरलेले न ठेवता ते कपाटात बंद असावेत.

* जागा पुरेशी मोठी असेल, तर तुम्ही तिथे कामाचे टेबल ठेवू शकता. परंतु, काम करताना किंवा अभ्यास करताना डोक्यावर थेट पायऱ्या दिसू नयेत, यासाठी वरच्या बाजूला प्लायवूडचे फॉल्स सीलिंग करून ती जागा सपाट करावी.

## सौंदर्य

* दिवसातून किमान दोनदा (सकाळी आणि रात्री) तुमच्या स्किन टाईपनुसार चांगला 'फेस वॉश' वापरा. साध्या साबणाने चेहरा धुणे टाळा, कारण साबणामुळे त्वचा कोरडी पडते.

* कोरड्या आणि काळ्या ओठांपासून वाचण्यासाठी रोज रात्री चांगला लिप बाम लावा. धूम्रपान करणे टाळा, कारण त्यामुळे ओठ काळे पडतात.

## सल्ला

कढीपत्त्याचे छोटे रोप नर्सरीतून आणून लावणे सर्वात सोपे पडते. महिन्यातून एकदा कुंडीत २-३ चमचे ताक पाण्यात मिसळून टाका, झाड खूप घनदाट होते. माती वरून वाळलेली दिसल्यावरच पाणी द्या.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६

**शिवरात्री, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, पुनर्वसु १०।१०, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : दिवस अत्यंत उत्साहाचा राहील. नवीन कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : धनलाभाचा उत्तम योग आहे. अडकलेले पैसे परत मिळतील.

**मिथुन** : कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदारी मिळेल. विचारांमध्ये स्पष्टता राहील.

**कर्क** : थोडी मानसिक धावपळ होईल. संध्याकाळपर्यंत परिस्थिती पूर्ववत होईल.

**सिंह** : मान-सन्मान आणि प्रतिष्ठा वाढेल. तुमचे मनोबल उंचावलेले राहील.

**कन्या** : मेहनतीचे योग्य फळ मिळेल. कष्टाचे चीज झाल्याने समाधान वाटेल.

**तुळ** : नशिबाची पूर्ण साथ लाभेल. जुन्या समस्यांवर योग्य मार्ग सापडेल.

**वृश्चिक** : कामांमध्ये काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. दिवस आव्हानात्मक राहील.

**धनु** : कौटुंबिक वातावरणात आनंद राहील. जोडीदाराशी संबंध दृढ होतील.

**मकर** : शत्रूंवर मात कराल. बऱ्याच दिवसांपासून रखडलेली कामे मार्गी लागतील.

**कुंभ** : कलागुणांना वाव मिळेल. अभ्यासात आणि संशोधनात यश लाभेल.

**मीन** : घरगुती सुख-शांती लाभेल. मालमत्तेची कामे पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७४९२ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | ८ | ■ | | ■ | |
| ९ | | ■ | १० | | | ११ | |
| | ■ | १२ | | ■ | ■ | | ■ |
| १३ | १४ | | ■ | ■ | १५ | | १६ |
| १७ | | ■ | १८ | १९ | | ■ | |
| ■ | २० | २१ | | | ■ | २२ | |
| २३ | | | ■ | २४ | | | |

**आडवे शब्द :-** १) अमुक; फलाणा ४) व्याकूळ ७) प्रतिकूल वर्तन; अडथळा; विरोध ९) सोळा पायल्या धान्याचे पूर्वीचे एक माप १०) लक्ष्मी व विष्णू १२) बुद्धिबळ, सोंगट्या वगैरे ज्यावर खेळतात ते विशिष्ट आकाराचे कापड १३) एक धान्य ज्याच्या पिठाच्या भाकरी बनविल्या जातात १५) माघारी; वापस ; पुन्हा १७) सैन्य; फौज ; सेना १८) एक तीर्थक्षेत्र २०) गावात तयार झालेला २२) शरीर; तेज २३) लंकेचा दहातोंडी राजा २४) आस्था; आपुलकी

**उभे शब्द :-** १) गुजरातची राजधानी (मूळ) २) मृत्यू; देहावसान; निधन ३) एक पक्षी; काग; वायस; कावळा ५) मकरालय; समुद्र; रत्नाकर ६) प्रेत जाळण्याठी रचलेली लाकडे वगैरे; चिता ८) गोणपाटाचा तुकडा; तातूक ११) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; नक्र १२) पंख असलेली गोष्टीतील स्त्री १४) जिल्ह्याचे ठिकाण असलेले महाराष्ट्रातील एक शहर १५) झाडाचे पान १६) तगमग; तडफड १८) गौरवर्णीय; उजळ रंगाचा १९) सुवर्ण; कांचन; सोने २१) जखम वगैरेचा त्वचेवर राहणारा डाग २२) दरारा; वचक; जरब

### शब्दगंध क्र. ७४९१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व | र | धा | वा | ■ | आ | क | स |
| स | ट | र | फ | ट | र | ■ | क |
| न | र | क | ■ | प | स | र | ट |
| ■ | ट | ■ | प | ■ | पा | त | ■ |
| अ | ■ | भा | र | ■ | नी | ल | म |
| र | मा | ■ | क | स | ■ | ■ | ल |
| मा | ■ | ग | र | मा | ग | र | म |
| स | म | स्त | ■ | ■ | र | म | ल |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : ज्यांच्यात एकटं चालण्याची जिद्द असते, त्यांच्याच मागे एक दिवस लोकांचा ताफा असतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### दूध उकळल्यावर उतू जातं, पण पाणी का गपचूप उकळतं?

दूध उकळल्यावर पातेल्याबाहेर उतू जातं पण पाणी मात्र गपचूप उकळत राहतं, यामागे एक खूप गमतीशीर विज्ञान दडलेलं आहे. हे समजून घेण्यासाठी आपल्याला आधी पाणी आणि दूध यांच्यातील फरक पाहावा लागेल. पाणी हे अतिशय साधं असतं, कारण त्यात फक्त पाण्याचेच कण असतात. जेव्हा आपण पाणी गॅसवर उकळायला ठेवतो, तेव्हा तळाशी असलेल्या पाण्याची वाफ बनते. हे वाफेचे हलके बुडबुडे वर येतात आणि पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन सहज फुटतात, ज्यामुळे ती वाफ हवेत निघून जाते. वाफेला अडवणारे पाण्यात काहीच नसल्यामुळे पाणी कितीही उकळले तरी ते पातेल्याबाहेर न जाता फक्त वाफ बनून उडून जातं.

पण दुधाची गोष्ट मात्र पूर्णपणे वेगळी असते. दूध हे फक्त पाणी नसून त्यात स्निग्ध पदार्थ म्हणजेच फॅट्स, प्रोटीन्स, साखर आणि वेगवेगळे क्षार एकत्र मिसळलेले असतात. जेव्हा दूध गरम व्हायला सुरुवात होते, तेव्हा दुधातील हे स्निग्ध पदार्थ आणि प्रोटीन्स हलके होऊन दुधाच्या वरच्या भागावर जमा होतात. हळूहळू या सर्वांचा मिळून दुधाच्या वरच्या तोंडावर एक चिवट आणि पातळ थर तयार होतो, ज्याला आपण साध्या भाषेत 'साय' किंवा 'मलाई' म्हणतो. ही साय दुधाच्या वरच्या भागावर एका घट्ट झाकणासारखी किंवा छतासारखी बसते.

दुधात जो पाण्याचा भाग असतो, त्याची खालून वाफ बनत असते. ही वाफ नेहमीप्रमाणे बुडबुड्यांच्या रूपात वर यायचा प्रयत्न करते, पण वर साचलेली साय त्या वाफेला बाहेर पडू देत नाही.खाली बनणारी वाफ मागे हटत नाही आणि वरची साय तिला रस्ता देत नाही. मग ती अडकलेली वाफ साईच्या थराला खालून वर ढकलायला सुरुवात करते. वाफेचे शेकडो बुडबुडे एकत्र आल्यामुळे दुधाचा मोठा फेस तयार होतो. जशी जशी उष्णता वाढत जाते, तशी वाफ त्या साईला आणि फेसाला जोराने वर-वर ढकलते आणि शेवटी हा सगळा फेसाचा डोंगर पातेल्याच्या कडेवरून थेट गॅसवर उतू जातो.

थोडक्यात सांगायचं तर, पाण्यात वाफेला अडवायला कोणी नसतं म्हणून पाणी उतू जात नाही, तर दुधात वर जमलेली साय वाफेचा रस्ता अडवते आणि ती अडकलेली वाफ दुधाला बाहेर ढकलते. म्हणूनच दूध उकळल्यावर उतू जातं आणि पाणी गपचूप उकळत राहतं!

### वाळवंटातील उंट आणि गुलाब

फार पूर्वीची गोष्ट आहे. एका अथांग आणि निर्जन वाळवंटाच्या मधोमध एक सुंदर लाल रंगाचा गुलाब फुलला होता. वाळवंटाची ती चोहोकडे पसरलेली कडक ऊन आणि वाळूची खाण, या सगळ्याच्या विरुद्ध तो गुलाब अतिशय देखणा आणि टवटवीत दिसत होता. त्या गुलाबाला आपल्या सौंदर्याचा फार अभिमान होता. तो नेहमी स्वतःशीच फुशारकी मारायचा, वा, मी किती सुंदर आहे! या ओसाड आणि कुरूप वाळवंटात माझ्यासारखा देखणा कोणीही नाही.

त्याच वाळवंटातून एक उंट नेहमी जायचा. एकदा उंट तिथे थबकला आणि त्याने त्या गुलाबाला म्हटले, अरे गुलाबा, तू खरोखरच खूप सुंदर आहेस. हे ऐकून तो गुलाब अजूनच गर्वानं फुगला आणि उंडाकडे उपरोधाने पाहत म्हणाला, तू माझ्याशी तुलना कशी करू शकतोस? तू दिसायला किती रुक्ष आणि ओबडधोबड आहेस. तुझ्या अंगावर कडक केस आहेत आणि पाय तर वेडेवाकडे आहेत. माझ्याकडे पाहिल्यावर कोणाचेही मन प्रसन्न होईल, पण तुझ्याकडे बघून कोणालाही भीती वाटेल. उंट अत्यंत शांत स्वभावाचा होता. तो गुलाबाच्या या बोलण्यावर काहीही बोलला नाही. तो फक्त मंद स्मित हासला आणि तिथून आपल्या वाटेने निघून गेला.

दिवस जात होते. उन्हाळा अधिक तीव्र झाला. वाळवंटात कडक ऊन पडू लागले आणि पाण्याचे एकही थेंब उरले नाही. हळूहळू वाळवंटातील उष्णता असह्य होऊ लागली. गुलाबाच्या अंगातील ताकद संपू लागली. त्याचे सुंदर पाकळ्या आता कोमेजू लागल्या आणि तो जमिनीकडे झुकू लागला. त्याच्याकडे आता उभे राहण्याचीही शक्ती उरलेली नव्हती. तो हळूहळू सुकत चालला होता आणि मरणाच्या दारात उभा होता.

तिकडून जाताना उंटाने त्या गुलाबाची ही दयनीय अवस्था पाहिली. उंटाला गुलाबाची खूप दया आली. उंटाच्या शरीरात नैसर्गिकरीत्या पाण्याची साठवणूक करण्याची क्षमता असते आणि तो वाळवंटातील कडक वातावरणातही सहज जगू शकतो. उंटाने पाऊल पुढे टाकले, स्वतःच्या शरीरातून थोडे पाणी आपल्या तोंडाद्वारे आणले आणि त्या सुकणाऱ्या गुलाबाच्या मुळाशी सोडले.

थोड्याच वेळात त्या थेंबभर पाण्यामुळे गुलाबाचे प्राण वाचले. त्याने डोळे उघडून पाहिले, तर समोर तोच उंट उभा होता, ज्याला काही दिवसांपूर्वी तो टोमणे मारत होता आणि तुच्छ लेखत होता. गुलाबाला आपल्या कृत्याची आणि गर्विष्ठपणाची खूप लाज वाटली. त्याच्या डोळ्यातून पश्चात्तापाचे अश्रू वाहू लागले. तो उंटाला म्हणाला, मित्रा, मी तुझ्याशी किती वाईट वागलो, तुझा अपमान केला. तरीही संकटात तू माझा जीव वाचवलास. मला माफ कर.

उंटाने गोड हसून त्याला उत्तर दिले, मित्रा, बाह्य सौंदर्यापेक्षा मनाची सुंदर आणि परोपकारी वृत्ती जास्त महत्त्वाची असते. संकटाच्या काळात एकमेकांना मदत करणे हेच आपले खरे कर्तव्य आहे. गुलाबाला जीवनाचा एक मोठा धडा मिळाला. त्याचा सर्व गर्व नाहीसा झाला आणि तो समजूतदार बनला.

बोध : नैतिकः कोणाच्याही बाह्य रूपावरून किंवा संपत्तीवरून त्याचे मूल्य ठरवू नये.

## आत्मशक्ति



### पुनर्जन्मावर विश्वास

जे लोक परमेश्वराशी जोडले गेलेले असतात ते सर्व लहानमोठ्या प्राणीमात्रांवर प्रेम करतात. परमेश्वराची ज्योति सर्वांना प्रकाशित करीत असते. हा ज्योतिर्मय प्रकाश जसा वाघ, मासा, पक्ष्यांत असतो तेवढाच कीडामुंगीतही असतो. जर आम्ही आत्मीय दृष्टीने जगाकडे पाहिले तर त्या प्रकाशास स्वतः पाहू शकतो. त्यामुळे आमचे प्रेम सर्वांसाठी विकसीत होते. खाली दिलेली गोष्ट संतांचे प्राण्यावर असलेले प्रेम स्पष्ट करते.भारतातील प्रसिद्ध संत साई भाकरी बनवीत होते. एका कुत्र्याने त्यांच्या खोलीत शिरून एक भाकर पळविली. त्याच्यामागे साई धावत असतांना आसपासच्या लोकांनी पाहिले. फक्त एक भाकरीसाठी ते कुत्र्याच्या पाठीमागे धावत आहेत ! असे त्यांनी (कुत्सितपणे) म्हटले. जेव्हा साईनी हांक दिली, अरे बाबा थांब, तुझ्या भाकरीलाही मला लोणी चोपडू दे. हे ऐकल्यावर लोक आश्चर्याने थक्क झाले. साईनी त्या कुत्र्याकडे एका पाहुण्याच्या रुपाने पाहिले होते. त्या पाहुण्यास ते लोणी लावलेली भाकरी खाऊ घालू इच्छित होते.जैन धर्मात सर्व प्राणीमात्रांवर दया करा असे सांगितले जाते. आपले तोंड ते फडक्याने झाकतात. आपल्या श्वासावाटे हवेत असलेले जीवजंतु जाऊन त्यांचा नाश होऊ नये असा त्यांचा त्यामागे उद्देश असतो. पाऊल टाकण्यापूर्वी ते आपला रस्ता साफ करतात कारण पायाखाली कुणी किडामुंगी चुकून येऊ नये.आमचा आत्मा जीवनरुपी मातीवर हळू हळू चालतो. कारण त्याच्यात प्रत्येक प्राण्यांत परमेश्वर पहाण्याची शक्ती असते आणि परमेश्वराच्या कुणा लेकराचा जीव घेण्याची त्याची इच्छा नसते. जेव्हा आम्ही जीवनाकडे अशा आत्मीय दृष्टीने चैतन्यशील होऊन बघतो, तेव्हा आम्ही प्रेमाने राहू लागतो व प्रत्येक प्राण्याबाबत आदर बाळगतो आणि ह्याच कारणाने आत्म्याशी संपर्क पावले लोक शाकाहारी बनतात. त्यांना माहित असते की परमेश्वराने त्यांना भोजनासाठी भरपूर फळे, भाज्या दिल्या आहेत त्यामुळे जनावरांना, पक्ष्यांना वा माशांना मारण्याची काहीच गरज पडत नाही.बौद्ध, जैन आणि हिंदू धर्मीय लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात. आत्मा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात फिरत असतो. मग ते शरीर माणसाचे असो वा दुसऱ्या कोण्या जीवाचे असो. त्यामुळे ते प्राण्याची हिंसा करीत नाही. त्यांच्या दृष्टीने सर्व

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### विशुद्ध ऊर्जेद्वारे नवीन जीवनाचे पोषण

खूप कर्कश संगीत अशा कुठल्याही प्रकारे आईने नकारात्मक माहिती स्वीकारू नये. बाळासाठी निरोगी स्पंदनं निर्माण करण्यासाठी पालकांनी एकत्र बसून ध्यान करायला हवं.बाळाला वाढवण्याच्या स्वतःच्या क्षमतेविषयी जर पालकांनी चिंता निर्माण केली किंवा होणाऱ्या बाळाच्या लिंगाविषयी विचार निर्माण केले तर ते बाळाला नाकाराची स्पंदनं पाठवतात आणि बाळाला आगंतुक असल्यासारखं वाटतं.

सुरेश ओबेरॉय :

मी एका घटनेचा मागे उल्लेख केला होता ज्यात मी आमच्या मॅनेजरला रागावलो आणि माझा १२ महिन्यांचा नातू त्यानंतर खूप वेळ अस्वस्थ होता. मी दुसऱ्या कोणावरतरी ओरडलो म्हणून बाळावर एवढा परिणाम का व्हावा ?

शिवानीदीदी :

आपल्या कुटुंबात जन्म घेणारा आत्मा देताना स्वतःचे संस्कार घेऊन येतो. सगळ्या मुलांमध्ये सारख्याच प्रमाणात अस्वस्थता दिसत नाही. तरंगांचा परिणाम होतो पण प्रत्येक आत्म्याला वाटलेल्या अस्वस्थतेची पातळी समान नसते. काही मुलं इतर मुलांपेक्षा जास्त हळवी असतात, त्यामुळे त्यांच्यात लवकर दुखावलं जाण्याचा संस्कार असतो. ज्या क्षणी आत्म्याला मोठ्यांमध्ये होत असलेल्या वादाची जाणीव होते, तेव्हा तो दुखावला जातो आणि रडायला लागतो.

सुरेश ओबेरॉय : असं मूल एखाद्या तणावाखाली असलेल्या माणसाच्या मांडीवर बसायलाही तयार होत नाही.

शिवानीदीदी : याचा अर्थ, त्या बाळाकडे तरंग ग्रहण करण्याची शक्ती जास्त आहे. आपल्याला या आत्म्याला खूप शक्तिशाली बनवावं लागेल कारण त्याला अजून अनेक गोष्टींना तोंड द्यायचं आहे. त्याच्यात शक्ती आहे आणि त्यामुळे बाह्य गोष्टींचा प्रभाव लगेच पडतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : गण्या, सांग पाहू... पृथ्वी गोल का आहे?

गण्या : सर, पृथ्वीवर इतका अभ्यास आणि टेन्शन आहे की, ती स्वतःच फिरून फिरून गोल झालीये!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. त्यावेळी महाराष्ट्रात किती जिल्हे होते? - ३६ जिल्हे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### ज्वारी

२) आजारपणात ज्वारीच्या पिठापासून पेज बनवून खावी. पेज पचण्यास अतिशय हलकी व उत्साहवर्धक असल्याने अशक्तपणा दूर होऊन तरतरी वाढते.

३) ज्वारीपासून लाह्या बनविल्या जातात. या लाह्यांचा उपयोग अपचन, अतिसार, उलटी, मळमळ या विकारांमध्ये हलके अन्न म्हणून करावा. वसंत ऋतूमध्ये शरीरात कफसंचय होऊन कफप्रकोप होतो. अशा वेळी कफ दूर करण्यासाठी ज्वारीच्या लाह्या व फुटाणे खावे. यामुळे शरीरात साचलेला कफ नाहीसा होतो. ज्वारीची कोवळी हिरवी ताटे ही उसासारखीच गोड लागतात. त्यामुळे ताटे तोडून उसाप्रमाणे चघळली असता यामध्ये असणारे 'ब' जीवनसत्त्व, कॅल्शिअम, लोह व प्रथिने यांचा मुबलक साठा शरीरास त्वरित मिळून आरोग्य अबाधित ठेवता येते.

४) ज्वारी खाल्ल्याने त्यामध्ये असणाऱ्या विपुल लोहामुळे रक्ताचे प्रमाण वाढते, म्हणून पंडुरोग (अनिमिया) असणाऱ्या रुग्णांनी ज्वारीची भाकरी नियमित खावी. फक्त ही भाकरी रूक्ष असल्याने वातप्रकोप होण्याची शक्यता असते. वातप्रकोप टाळण्यासाठी ताज्या भाकरीवर गायीचे एक चमचा साजूक तूप टाकून ती खावी. तूप टाकून भाकरी खाल्ल्याने भाकरी अधिक चविष्ट, पौष्टिक, गुणकारी व बलदायी ठरते.

५) ज्वारीच्या पानांवर सकाळच्या वेळी पडले दवबिंदू हे नेत्रविकार, डोळ्यांची आग, मोतिबिंदू, डोळ्यातून सतत पाणी येणे या विकारांवर डोळ्यात घातल्यास सर्व विकार दूर होतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रभाग २ मध्ये डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियानाची जनजागृती

नगर – महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियानाच्या माध्यमातून शहरा मध्ये डेंग्यू आजाराबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. या अभियानामुळे नागरिकां मध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून डेंग्यूच्या रुग्णसंख्येतही घट झाली आहे. अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने प्रभाग क्रमांक २ मध्ये डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियानाचा शुभारंभ आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आला.



महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियानाच्या माध्यमातून शहरामध्ये डेंग्यू आजाराबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. (छाया : लहू दळवी)

आजाराबाबत जनजागृती केली जात आहे. त्याचबरोबर आरोग्य विभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या घरोघरी जाऊन आरोग्याची तसेच साठविलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात येत असून आवश्यक त्या ठिकाणी औषध फवारणी व धूर फवारणी केली जात आहे.

नगरसेवक निखिल वारे म्हणाले, महापालिका आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी व डॉक्टर चांगले काम करीत आहेत. जास्तीत जास्त आरोग्य सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात यावे. महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. तसेच डेंग्यूची तपासणी महापालिकेच्या आरोग्य केंद्रामध्येच उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियानाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थी, आशा सेविका आणि आरोग्य सेविका नागरिकांमध्ये जनजागृती करीत आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील तसेच परिसरातील पाणीसाठ्यांची नियमित तपासणी करावी. तसेच आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

यावेळी मनपा महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका संध्याताई पवार, नगरसेविका रोशनीताई त्रिंबके, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, सुनील त्रिंबके, डॉ. विजय देशपांडे, डॉ. सुदाम रानडे, डॉ. मनोहर देशपांडे, शारदा पोखरकर, योगेश पिंपळे, डॉ. वृषाली आरु, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. आरती डापसे, आकाश त्रिंबके, धीरज उकिरडे आदी उपस्थित होते.

आयुक्त डांगे म्हणाले, सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून साठलेल्या स्वच्छ पाण्यामध्ये डेंग्यूच्या डासांची निर्मिती होत असते. डेंग्यू हा जीवघेणा आजार असून त्याचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांमध्ये डेंग्यू

उपसभापती वर्षा सानप यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. सृष्टी बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यू आजाराबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले. डेंग्यू आजाराची उत्पत्ती कशी होते, डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. एन. जी. पाऊलबुद्धे व आनंद विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून डेंग्यू आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली. नाट्य, भारूड व गीतांच्या माध्यमातून डेंग्यू प्रतिबंधाचा संदेश देण्यात आला. यावेळी नगरसेविका रोशनीताई त्रिंबके व नगरसेविका संध्या पवार यांनी डेंग्यू आजारापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली. नागरिकांनी घर व परिसरात पाणी साचू न देता स्वच्छता राखावी आणि डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियानाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सहनशीलतेलाही मर्यादा असते

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स




समुद्र तसा शांत आणि गंभीर, पण त्यानेदेखील कुठवर धरावा धीर? देव आणि दानव सारखे घुसळत बसले त्याचे नीर. तो सहनशील आणि दानवीर. कुणाला दुखविणे शक्यच नाही. तो सज्जन, सत्त्वशील, तेव्हा मर्यादेच्या बाहेर कसा जाईल? पण आत्यंतिक छळ झाला, तर तो शांततरी कसा राहील? देव आणि दानव यांना नाही समुद्राविषयी कणव. पर्वताची रवि आणि प्रचंड नागाचा दोर करुन अंतच पाहून लागले त्याचा. अशा अविचारी लोकांना मग थोरांनी, सज्जनांनी, मर्यादशीलांनी नको का धडा शिकवायला?

आपल्या अंगाचे घुसळणें समुद्राने किती सहन करायचे? दुसऱ्या पायी पीडा सोसायची, तिलाही मर्यादा नसावी असे म्हणायचे? सज्जन असले, तरी त्यांनाही जीव आहे की नाही? देव असले म्हणून काय झाले? दानवांच्या संगतीत तेही अविचारी झाले. निष्ठुर बनले. समुद्राच्या अंत:करणाला असह्य वेदना देऊ लागले. मग समुद्राचे काय चुकले? त्याने हलाहल ओकले. पण एकदम का त्याने हे केले नाही? प्रथम केवढे तरी औदार्य दाखविले। दानशूरत्प प्रकट केले. अमाप संपत्ती नव्हे, प्रत्यक्ष लक्ष्मीचे दान दिले. मग शीतल चंद्र आणि पाठोपाठ प्रत्यक्ष अमृत दिले. तर त्या स्वार्थी, हपापलेल्या देव दानवांचे समाधानच नाही झाले. सहनशील असणे म्हणजे काय मुर्दाड बनणे? कुणी जिवावर उठले, तर स्वस्थ बसावे?

जो सज्जनांचा धर्म पाळतो. दुसऱ्याचे भले करतो आणि नीतीनुसार वागतो असे सुजनांशी भला, पण जशाशी तसा त्या नराला भगवंते पाहिजे राखिला, तर तो संकटात सापडला. सज्जनांच्या जिवावर उठलेल्या दुष्टाला, जसे पाण्यात करावे नष्ट मातीच्या ढेकळाला, तसा न्यावा तात्काळ नाशाला.

एक होते गाढव. सहनशील मोठे. सज्जनही केवळ त्याच्यापाठीवर लादले ओझे. लोक म्हणाले, अबब ओझं केवढं. मालक म्हणाला, तुम्हाला काय करायचंय? गाढव माझं आहे. गाढव बिचारे स्तब्ध उभे. मग मालक त्याच्या पाठीवर बसला. मालकाजवळ स्वत:चेही सामानही खूप होतं. गाढवाचे प्राण कंठाशी आले. ते चौखूर उधळले. त्याच्या सामानासह त्याने मालकाला जमीनदोस्त केले. मालक संतापला. लोक म्हणाले, गाढवानं योग्य केलं. मालकानं स्वत: बसावं, पण त्या बिचाऱ्या गाढवावर स्वत:चं एवढं मोठं सामानही लादावं?

मालक म्हणाला, लोकहो मी गाढवावर बसलो, हे खरं, पण माझ्या सामानाचं ओझं मी गाढवावर नाही लादलं. ते मी माझ्या डोक्यावर घेतलं होतं.आधीच दुष्टपणा, त्यात ढोंगी बहाणा. अशा परिस्थितीत सहनशील गाढवाने जे केले तो शहाणपणाच होता.

**– किशोर गांधी**



अहिल्यानगरच्या जिल्हा न्यायालयाच्या प्रबंधकपदी संदीप कडू यांची नियुक्ती झाल्याबद्दल बार असोसिएशनच्या वतीने त्यांचा सत्कार करताना ॲड. कृष्णा झावरे, भाऊसाहेब घुले, विनोद शेटे, सुरेश लगड, संदीप शेळके, सुरेश भोर आदी.

# जिल्हा न्यायालयाच्या प्रबंधकपदी संदीप कडू यांची नियुक्ती

नगर – अहिल्यानगरच्या जिल्हा न्यायालयाच्या प्रबंधकपदी संदीप कडू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा प्रधान व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी ही नियुक्ती केली असून संदीप कडू यांनी प्रबंधकपदाचा पदभारही घेतला आहे.

नूतन प्रबंधक संदीप कडू यांच्या या नव्या नियुक्तीबद्दल अहमदनगर बार असोसिएशनचे वतीने अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, सचिव ॲड. विनोद शेटे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. संदीप शेळके, ॲड. सुरेश भोर, ॲड. रोहित कळमकर व ॲड रणजीत गोरे आदी उपस्थित होते.

# शालेय क्रीडा स्पर्धांना ऑनलाईन प्रणालीचा ब्रेक

## जुनी क्लिक स्पोर्ट्स वेबसाईट सुरू ठेवण्याची क्रीडा शिक्षक महासंघाची मागणी

नगर – राज्यातील शालेय क्रीडा स्पर्धांच्या नियोजनासाठी शासनाने यंदापासून नवीन ऑनलाईन वेबसाईट सुरू केली असली, तरी त्यामधील तांत्रिक अडचणींमुळे संपूर्ण नोंदणी प्रक्रिया ठप्प झाली आहे. ऑगस्ट महिना सुरू होऊनही अनेक शाळांची नोंदणी पूर्ण झालेली नसून, खेळाडू नोंदणीसाठी आवश्यक असलेले प्रायमरी फॉर्म उपलब्ध नसल्याने जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रकच विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर जुनी क्लिक स्पोर्ट्स वेबसाईट पूर्ववत सुरू ठेवण्याची मागणी अहिल्यानगर जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाने शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळा नोंदणी, खेळाडू नोंदणी, प्रायमरी फॉर्म, विविध अनुदान विषयक माहिती तसेच शासन निर्णय यामध्ये राज्यभर एकसारखेपणा राहावा, या उद्देशाने शासनाने यावर्षी नवीन ऑनलाईन पोर्टल सुरू केले आहे. मात्र प्रत्यक्षात या पोर्टलवर शाळांची नोंदणी करतानाच अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार क्रीडा शिक्षकांकडून केली जात आहे.

याशिवाय खेळाडू नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या प्रायमरी फॉर्मची प्रक्रिया अद्याप सुरु न झाल्यामुळे विद्यार्थ्यांची नोंदणीच होऊ शकत नाही. परिणामी शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन रखडले असून, हजारो विद्यार्थी स्पर्धांपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मागील अनेक वर्षांपासून शालेय क्रीडा स्पर्धांची ऑनलाईन प्रक्रिया क्लिक स्पोर्ट्स या संकेतस्थळामार्फत राबविण्यात येत होती. त्याच संकेतस्थळावर खेळाडूंची प्रमाणपत्रे उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना ती कोणत्याही वेळी सहज डाउनलोड करता येत होती. मात्र शासनाने नवीन प्रणाली सुरू केल्यानंतर क्लिक स्पोर्ट्ससोबतचा करार संपुष्टात आल्याने जुने पोर्टल बंद झाले आहे. त्यामुळे अनेक वर्षांतील स्पर्धा प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध होत नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे शालेय व महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेत, ग्रेस गुण मिळविण्यासाठी, शिष्यवृत्ती, नोकरी तसेच विविध शासकीय प्रस्तावांसाठी खेळाडूंना क्रीडा प्रमाणपत्रांची आवश्यकता भासते. मात्र जुनी प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांची मोठी गैरसोय होत असल्याचे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे. नवीन पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करून शाळा व खेळाडू नोंदणीची प्रक्रिया सुरळीत करावी. तसेच नवीन प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत जुनी क्लिक स्पोर्ट्स वेबसाईट सुरू ठेवून पूर्वीची सर्व प्रमाणपत्रे डाउनलोड करण्याची सुविधा कायम ठेवावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाने केली आहे. याबाबतचे निवेदन महासंघाचे अध्यक्ष नंदकुमार शितोळे, कार्याध्यक्ष अजित वडवकर, उपाध्यक्ष बापूराव होळकर, सचिव नितीन घोलप तसेच सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, सुनील गागरे, घनश्याम सानप, तुवर पाटील, बापूराव गायकवाड, किरण चौधरी, काकासाहेब चौधरी आणि सुनील मंडलिक यांनी शासनाकडे पाठवले आहे.

# फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचे वर्चस्व

## आर्मी पब्लिक स्कूलची दमदार कामगिरी; विविध वयोगटांतील रंगतदार लढतींनी रंगवला दिवस

नगर – फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी (दि. ७ ऑगस्ट) अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचे रंगतदार सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दिवसभर झालेल्या सामन्यांमध्ये प्रवरा पब्लिक स्कूलने अनेक गटांत दमदार कामगिरी करत एकहाती वर्चस्व गाजवले, तर आर्मी पब्लिक स्कूलनेही प्रभावी खेळाच्या जोरावर महत्त्वपूर्ण विजय मिळवले. अनेक सामन्यांमध्ये खेळाडूंनी हॅट्रिकची नोंद करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले.



प्रवरा पब्लिक स्कूल व ओएसिस स्कूल यांच्यात रंगलेला सामना.

सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने २–० गोलने विजय मिळवला. आर्मी पब्लिक स्कूलकडून सिद्धी पोटे हिने ३३ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भावना हिने आणखी एक गोल करत संघाचा विजय निश्चित केला. यानंतर प्रवरा पब्लिक स्कूल आणि आठरे पाटील स्कूल यांच्यातील १६ वर्षांखालील मुलींचा सामना चुरशीचा झाला. प्रवरा पब्लिक स्कूलच्या दामिनी जाधव हिने २१ व्या मिनिटाला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर संघाने उत्कृष्ट बचावात्मक खेळ करत आठरे पाटील स्कूलला एकही गोल करण्याची संधी दिली नाही आणि प्रवरा पब्लिक स्कूलने १–० गोलने विजय मिळवला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर ७–० गोलने दणदणीत विजय मिळवला. सामन्याच्या ४ थ्या मिनिटाला धीरज चारस्कर आणि ५ व्या मिनिटाला युवराज आहेर यांनी सलग गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ८, १७ आणि २७ व्या मिनिटाला वैभव कविटकर याने सलग तीन गोल करत हॅट्रिक पूर्ण केली. १० व्या मिनिटाला रणविजय जामकर आणि ४० व्या मिनिटाला मयुर पिंपळे यांनीही गोलांची भर घालत प्रवराचा एकतर्फी विजय निश्चित केला.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल आणि ओएसिस स्कूल यांच्यात रंगतदार सामना झाला. प्रवराकडून वरद चौहान याने ४ थ्या मिनिटाला गोल करत आघाडी मिळवून दिली. मात्र १९ व्या मिनिटाला ओएसिस स्कूलच्या आर्यन पंडित याने गोल करत बरोबरी साधली. त्यानंतर प्रवराने पुन्हा आक्रमक खेळ करत २७ व्या मिनिटाला श्रेयश डोईफोडे आणि ४२ व्या मिनिटाला कुनाल कानडे यांनी गोल करत संघाला ३–१ गोलने विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ओएसिस स्कूलवर ७–० गोलने सहज विजय मिळवला. ४ थ्या मिनिटाला अभिनव राऊत याने गोल करत सुरुवात केली. त्यानंतर ११, १२ आणि १७ व्या मिनिटाला रामचंद्र पालवे याने सलग तीन गोल झळकावत हॅट्रिक नोंदवली. २८ आणि ४५ व्या मिनिटाला निखील वायभट याने दोन गोल केले, तर ३५ व्या मिनिटाला प्रविण काळे याने गोल करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या सामन्यात ओएसिस स्कूलला एकही गोल करता आला नाही.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ओएसिस स्कूलचा ४–० गोलने पराभव केला. या सामन्यात युवराज आहेर याने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत ३, १४, १९ आणि २९ व्या मिनिटाला तब्बल चार गोल झळकावले आणि संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने कर्नल परब स्कूलवर ७–० गोलने एकतर्फी विजय मिळवला. हेमा गावित हिने ५ व्या मिनिटाला गोल करत सुरुवात केली आणि त्यानंतर १५ व्या तसेच ४० व्या मिनिटाला गोल करत हॅट्रिक पूर्ण केली. १० व्या मिनिटाला रोशनी झिरवळ, ३० व्या मिनिटाला कल्याणी भोसले, ३१ व्या मिनिटाला दामिनी जाधव आणि ४४ व्या मिनिटाला आरती बोरसे यांनी प्रत्येकी एक गोल करत प्रवराचा मोठा विजय निश्चित केला.

दिवसातील अखेरच्या सामन्यात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूलने कर्नल परब स्कूलचा ३–० गोलने पराभव केला. आर्मी पब्लिक स्कूलकडून प्रथम गव्हाणे याने १७ व्या आणि ३८ व्या मिनिटाला दोन गोल केले, तर ३० व्या मिनिटाला विजय सांगळे याने एक गोल करत संघाचा विजय निश्चित केला.



युनिफाईट जिल्हा निवड चाचणीत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

# युनिफाईट जिल्हा निवड चाचणीत नेप्तीच्या खेळाडूंची सुवर्णमय कामगिरी

नगर – युनिफाईट असोसिएशन, अहिल्यानगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ व्या युनिफाईट जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत नेप्ती (ता. नगर) येथील सुरेश कराटी अक्ॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण पदकांची कमाई केली. उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, आत्मविश्वास आणि शिस्तबद्ध खेळाच्या जोरावर या खेळाडूंनी जिल्हास्तरावर आपले वर्चस्व सिद्ध केले. त्यांच्या या यशामुळे नेप्ती गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

जनता विद्यालय, काष्टी येथे नुकत्याच पार पडलेल्या या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत जिल्हाभरातील विविध कराटे व युनिफाईट प्रशिक्षण केंद्रांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या स्पर्धांमध्ये नेप्ती येथील सुरेश कराटी अकॅडमीच्या खेळाडूंनी आपल्या दमदार कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेत आयुष जाधव, शौर्य त्र्यंबके, मोहित जाधव, प्रथमेश वैराळ आणि गौरी त्र्यंबके यांनी सुवर्णपदक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तर गौरव त्र्यंबके याने रौप्यपदक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशस्वी खेळाडूंचा नेप्ती गावात जिल्हा सिलंबम असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष पै. नाना डोंगरे व नेप्ती विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक जालिंदर शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुरेश कदम, योगेश त्र्यंबके, कुमार त्र्यंबके, संदीप खामकर, सतीश पाचारणे, ह.भ.प. जपकर महाराज, शिवलिंग त्र्यंबके, खेळाडूंचे पालक, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते. या खेळाडूंना प्रशिक्षक सुरेश जाधव आणि भारती पाचारणे यांचे मार्गदर्शन लाभले. सुवर्णपदक विजेते खेळाडू आता २२ व २३ ऑगस्ट रोजी सातारा जिल्ह्यात होणाऱ्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

# महिलांचा सन्मान हा राजकारणाचा नव्हे, संस्कारांचा विषय

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेनेकडून निषेध



ॲड. स्वाती जाधव

नगर – महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. शिवसेना महिला आघाडीच्या नेत्या स्वाती जाधव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात महिलांचा सन्मान हा राजकारणाचा विषय नसून तो आपल्या संस्कारांचा आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले.

ॲड स्वाती जाधव म्हणाल्या की, कोणत्याही पक्षाच्या महिला नेत्या असोत किंवा समाजातील कोणतीही महिला, त्यांच्याविषयी अपमानास्पद किंवा अवमानकारक भाषा वापरणे हे अत्यंत निषेधार्ह आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याबाबत करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडी जाहीर आणि तीव्र निषेध करते.

महिलांचा अपमान हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांना कोणत्याही परिस्थितीत समर्थन दिले जाणार नाही. महिलांचा स्वाभिमान, सुरक्षितता आणि सन्मान जपण्यासाठी शिवसेना महिला आघाडी कायम ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी नमूद केले. यापुढे कोणत्याही महिला नेत्या किंवा सर्वसामान्य महिलांविषयी अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही ॲड स्वाती जाधव यांनी केली. त्यांनी सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांना महिलांविषयी आदराची भूमिका कायम ठेवण्याचे आवाहन केले.

राजकारण मतांचे असते; पण महिलांचा सन्मान हा सर्वांचा समान धर्म असतो. महिलांचा आदर राखणे ही प्रत्येकाची सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे, असे ॲड. स्वाती जाधव यांनी शेवटी म्हटले. महिलांचा अनादर करणाऱ्यांना आता सुट्टी नाही कडक कार्यवाही होणार महिलांचा अपमान म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान! हा अपमान शिवसेना कदापि खपवून घेणार नाही. असेही त्या म्हणाल्या.

# आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये अभियांत्रिकी, एमबीए आणि एमसीए अभ्यासक्रमांच्या पहिल्या फेरीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

नगर – शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी, एमबीए, आणि एमसीए या अभ्यासक्रमांच्या पहिल्या फेरीची प्रवेश प्रक्रिया ३ ते ५ ऑगस्ट दरम्यान संपन्न झाली असून, नगर तालुक्यातील चास येथील आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी ९० टक्के जागांचे वाटप झाले आहे. तसेच मिळालेल्या जागांवर विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन ८० टक्के प्रवेश निश्चित केले आहेत. तरी अजूनही भरपूर विद्यार्थ्यांना इच्छा असूनही प्रवेश मिळाला नाही. अनेक विद्यार्थी आणि पालक प्रवेशाबाबत चौकशी करत आहेत.



आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी झालेली विद्यार्थ्यांची गर्दी.

आजच्या स्पर्धात्मक युगात योग्य अभ्यासक्रमाची निवड आणि योग्य करिअर मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आवडीनिवडी आणि भविष्यातील करिअरच्या संधी लक्षात घेऊन मार्गदर्शन केले जात आहे. महाविद्यालयात २०० हुन अधिक उच्चशिक्षित प्राध्यापकवर्ग असून त्यामध्ये आयआयटी, एनआयटी मधील ४५ हुन अधिक पी एच डी धारक आहेत. १८२ पेक्षा जास्त पेटंट, ५०० हुन अधिक संशोधन निबंध, तसेच २ कोटींपेक्षा अधिक संशोधन निधी विविध शासकीय संस्थांकडून मिळाले आहेत. आयओटी व रोबोटिक्स, ड्रोन्स, ३डी प्रिंटिंग असे विविध उत्कृष्टता केंद्र महाविद्यालयास देण्यात आले आहेत. तसेच आजपर्यंत महाविद्यालयाच्या ३००० हुन अधिक विद्यार्थ्यांना मागील २ वर्षांत विविध नामांकित कंपन्यांमध्ये कॅम्पसद्वारे नोकरी मिळाली आहे. याचा परिणाम म्हणून महाविद्यालयाचे सर्व प्रवेश मागील ३ वर्षांपासून १०० टक्के पूर्ण होत आहेत, असे संस्थेचे संचालक व प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील यांनी नमूद केले.

अजूनही प्रवेशाच्या तीन फेऱ्या बाकी असून द्वितीय फेरी ७ ऑगस्ट २०२६ ते ९ ऑगस्ट दरम्यान आहे. तरी अजूनही जे विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी दुसऱ्या फेरीमध्ये ५३८० हा महाविद्यालयीन कोड टाकून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी केले आहे.

# विचार भारतीच्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासाबाबत मार्गदर्शन


विचार भारती आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अ‍ॅड. विक्रम एडके, उद्योजक मिलिंद गंधे, विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे, कार्यशाळेचे प्रमुख मिलिंद कुलकर्णी, राजेश झंवर आदी.

नगर – विद्यार्थ्यांमधील सुप्त कौशल्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य दिशा देण्यासाठी विचार भारतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जीवन समृद्ध करणाऱ्या कार्यशाळेला शहरातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिवसभर सहभागींना मार्गदर्शन करत करिअर, व्यक्तिमत्त्व विकास आणि कौशल्य विकासाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा विकास करण्याच्या उद्देशाने त्यांच्यातील कला क्रीडा नैपुण्याचा उपयोग होण्यासाठी दिग्गजांनी सहभागींना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत शहरातील विविध शाळांमधील सुमारे १२० विद्यार्थी, पालक व शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे, कार्यशाळेचे प्रमुख मिलिंद कुलकर्णी आदींसह तज्ज्ञ प्रशिक्षक उपस्थित होते.

कार्यशाळेचे उद्घाटन उद्योजक मिलिंद गंधे व प्रभावी व्याख्याते अ‍ॅड. विक्रम एडके यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध लेखक व वक्ते डॉ. सागर देशपांडे व प्रसिद्ध समुपदेशक अभय जठार यांनी सहभागींशी संवाद साधून मार्गदर्शन केले. शिक्षक आणि पालक यांनी विद्यार्थ्यांशी कसा संवाद केला पाहिजे या बाबत अभय जठार यांनी नाविन्यपूर्ण पद्धतीने पालकांना व शिक्षकांना समजावून सांगितले.

अ‍ॅड. विक्रम एडके म्हणाले, आजच्या शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांना योग्य वयात योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक जण भरकटतात. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या भस्मासुरापुढे टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःतील कौशल्ये ओळखून त्यांचा सातत्याने विकास करणे आवश्यक आहे. कला, साहित्य, नाट्य, संस्कृती, क्रीडा अशा विविध क्षेत्रांतील गुणांना योग्य दिशा देण्यासाठी अशा कार्यशाळा सातत्याने आयोजित होणे गरजेचे असून हा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर राबविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

डॉ. सागर देशपांडे यांनी सांगितले, स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न धावता आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविण्याचा आत्मविश्वास बाळगला पाहिजे. अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम व करिअरविषयक भीती कमी होऊन योग्य निर्णय घेण्यास मदत होते. प्रत्येक शाळेने अशा उपक्रमांचे आयोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

परिसंवादात संगीतकार डॉ. निरज करंदीकर, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते निर्मल थोरात, अभिनेते मोहनीराज गटाने, चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे, विक्रम एडके यांनी आपल्या क्षेत्राचा यशस्वी प्रवास उलगडला. सूत्रसंचालन डॉ. ऋषिकेश कुलकर्णी यांनी केले. तसेच चैत्राली पांडे, चैत्राली जावळे, वृषाली मांडे, जया देशपांडे, क्रीडा प्रशिक्षक राजेश भालसिंग, प्रसाद सुवर्णपाठकी, डॉ. ऋषिकेश कुलकर्णी व चित्रकार अशोक डोळसे या दिग्गजांनी सहभागींना सखोल मार्गदर्शन केले.

प्रारंभी राजेश झंवर यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यशाळेच्या संकल्पनेची माहिती दिली. विशारद पेटकर यांनी सूत्रसंचालन केले. श्रीगोपाल जाखोटिया यांनी आभार मानले. यावेळी अरुण कुलकर्णी, रवींद्र मुळे, संपत बारस्कर, महेंद्र जाखेटे, अनिल मोहिते, डॉ.निळकंठ ठाकरे, रवींद्र बारस्कर आदीसह नागरिक उपस्थित होते.


पिंपळगाव माळवी येथे त्रिदल माजी सैनिक सेवा संघाच्या शाखेच्या स्थापनेवेळी संघासाठी ११ हजारांचा धनादेश देताना मनसुख वाबळे, समवेत आ. अक्षय कर्डिले व संघाचे पदाधिकारी.

# त्रिदल माजी सैनिक सेवा संघाच्या शाखेची पिंपळगाव माळवीत स्थापना

नगर – त्रिदल माजी सैनिक सेवा संघाची स्थापना नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक चौधरी होते. आ. अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांनी माजी सैनिकांच्या विविध समस्या शासनस्तरावर पाठपुरावा करून सोडविण्याचे आश्वासन दिले. संघाच्या कार्यासाठी माजी सैनिक मनसुख वाबळे यांनी ११ हजार रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक मदतीचा हात दिला. माजी सैनिक मनसुख वाबळे हे समाजकार्यात सातत्याने कार्यरत असून उद्योग–व्यवसायाच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील गरजू व्यक्तींना नेहमीच मदतीचा हात देत असतात. माजी सैनिकांच्या कल्याणासाठी ते कायम पुढाकार घेत असून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करतात. त्यांच्या सुरक्षा गार्ड एजन्सीच्या माध्यमातून अनेक माजी सैनिकांना रोजगार उपलब्ध करून देत त्यांनी त्यांच्या सन्मानाने पुनर्वसनासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

कार्यक्रमास माजी सैनिक, ग्रामस्थ व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने स्थापन झालेल्या त्रिदल माजी सैनिक सेवा संघाच्या माध्यमातून माजी सैनिकांचे प्रश्न संघटितपणे मांडून त्यांच्या कल्याणासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# डॉ. संकेत लोढा यांना पीएच. डी. पदवी प्रदान

## संशोधन क्षेत्रात राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी



नगर – शैक्षणिक, संशोधन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात सातत्यपूर्ण योगदान देणारे डॉ. संकेत रमाकांत लोढा यांना एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी व्यवस्थापनशास्त्र विषयातील तत्त्वज्ञान विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान केली आहे. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार, त्यांच्या अ‍ॅनॅलिसिस ऑफ मार्केटिंग बेस्ड ऑन कस्टमर सेग्मेंटेशन युजिंग मशीन लर्निंग या संशोधन प्रबंधास मंजुरी मिळाली असून त्यांना पीएच.डी. पदवी घोषित करण्यात आली आहे.

या संशोधन प्रबंधाचे मूल्यमापन भारत सरकारच्या गृह मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेतील नॅशनल फॉरेन्सिक सायन्सेस युनिव्हर्सिटी (एनएफएसयू) येथील तज्ज्ञ परीक्षकांकडून करण्यात आले. आयआयटीमधील डॉ. चौधरी यांनीही स्वतंत्रपणे प्रबंधाचे परीक्षण केले. डॉ. लोढा यांच्याकडे १३ वर्षांहून अधिक अध्यापन आणि औद्योगिक अनुभव असून ते अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये तज्ज्ञ वक्ते म्हणून मार्गदर्शन करतात. तसेच गुगल डेव्हलपर ग्रुप्समध्ये फॅकल्टी अ‍ॅडव्हायझर म्हणूनही ते कार्यरत आहेत.

संशोधन क्षेत्रात डॉ. लोढा यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरही उल्लेखनीय ओळख निर्माण केली आहे. ते युरोपियन जर्नल ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस अँड इन्फॉर्मेटिक्स, युरोपियन जर्नल ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड रिव्ह्यूज आणि जर्नल ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड व्हेटरिनरी अँड ॲनिमल रिसर्च यांसारख्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचे परीक्षक म्हणून कार्यरत आहेत. तसेच कॉम्प्सायन्स अँड एआय अ‍ॅडव्हान्सेस (कोलंबस, ओहायो, अमेरिका) या नियतकालिकाचे आंतरराष्ट्रीय संपादक आणि ऑस्ट्रेलियन बिझनेस डिन्स कौन्सिल (एबीडीसी) मान्यताप्राप्त एम्पिरिकल इकॉनॉमिक्स लेटर्स या नियतकालिकाचे अतिथी संपादक म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. याशिवाय ते आयईईई परिषदेचे परीक्षक म्हणूनही कार्यरत आहेत.

त्यांच्या संशोधन कार्यातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्यांच्या दोन संशोधन लेखांची नासा, स्मिथसोनियन इन्स्टिट्यूशन आणि हार्वर्ड एडीएस या डेटाबेसमध्ये अनुक्रमणिका करण्यात आली आहे. त्यांचे अनेक संशोधन लेख स्कोपस आणि आयईईई एक्सप्लोरमध्येही प्रकाशित झाले आहेत. डॉ. लोढा यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग आणि आरोग्य तंत्रज्ञान अशा विविध विषयांवर अनेक संशोधन लेख प्रकाशित केले आहेत. त्यांच्या संशोधनाचा समावेश आयईईई, स्प्रिंगर, स्कोपस तसेच इतर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकांमध्ये झाला आहे.

शैक्षणिक लेखन क्षेत्रातही डॉ. लोढा यांचे योगदान उल्लेखनीय असून त्यांनी अनेक पुस्तके व पुस्तक प्रकरणांचे लेखन केले आहे. पायथॉन, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि अल्गोरिदम या विषयांवरील त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. बौद्धिक संपदा क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय असून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली, ग्राहक वर्गीकरण, रिसायकलिंग बिन, इंटरनेट ऑफ थिंग्जवर आधारित उपकरणे, आरोग्यविषयक तंत्रज्ञान आदी विषयांवरील अनेक डिझाईन पेटंट, युटिलिटी पेटंट आणि कॉपीराइट्स त्यांच्या नावावर आहेत.

डॉ. लोढा यांना २०२४ मध्ये बेस्ट टीचर स्टेट लेव्हल (राज्यस्तरीय शिक्षक रत्न) पुरस्कार, नॅशनल एन्व्हायर्नमेंट वॉरियर पुरस्कार, विश्व इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट रिसर्च एक्सलन्स पुरस्कार आणि रिसर्च एक्सलन्स पुरस्कार, तर २०२५ मध्ये विद्याभूषण पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रश्नपत्रिका निर्माते, बाह्य परीक्षक, सत्राध्यक्ष, परीक्षक, साधन व्यक्ती तसेच विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये तज्ज्ञ वक्ते म्हणून योगदान देत आहेत. डॉ. संकेत लोढा यांची पीएच.डी. पदवी, राष्ट्रीय स्तरावरील प्रबंध मूल्यमापन, आंतरराष्ट्रीय संशोधन, संपादकीय जबाबदाऱ्या, पेटंट्स, पुस्तके, संशोधन लेख आणि पुरस्कार यामुळे महाराष्ट्रासह देशातील संशोधन व उच्च शिक्षण क्षेत्रात त्यांचे नाव विशेष उल्लेखनीय ठरत आहे.

# रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा; युवकांनी रक्तदानाचा संकल्प करावा

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; आरोग्य, रक्त तपासणी व औषधोपचार शिबिरात रुग्णांची तपासणी


महापालिका व साईदीप सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अ‍ॅड. अवधूत फुलसौंदर यांच्या प्रयत्नातून आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप, समवेत मान्यवर.

नगर – नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचाव्यात या उद्देशाने अहिल्यानगर महापालिका व साईदीप सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अ‍ॅड. अवधूत फुलसौंदर यांच्या प्रयत्नातून आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य, रक्त तपासणी व औषधोपचार शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी शेकडो रुग्णांची तपासणी करून मोफत वैद्यकीय सल्ला व औषधोपचार दिले.

यावेळी बोलताना आ.जगताप म्हणाले की, नागरिकांमध्ये विविध प्रकारच्या आरोग्य समस्या वाढत असून त्यांना अधिकाधिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. गरजू रुग्णांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी अशा मोफत आरोग्य शिबिरांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. अशा शिबिरांमधून प्राथमिक तपासणी होऊन आजारांचे वेळेत निदान होते व डॉक्टरांना योग्य वेळी उपचार करता येतात.

ते पुढे म्हणाले की, महिलांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. महिला ही कुटुंबाचा कणा असून तिचे आरोग्य सुदृढ असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहते. थॅलेसेमियासारख्या आजारांमुळे अनेक रुग्णांना नियमित रक्ताची गरज असते. मात्र रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा मोठा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढे यावे.

या कार्यक्रमास माजी महापौर भगवान फुलसौंदर, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, नगरसेविका मीनाताई चोपडा, बाळासाहेब बारस्कर, अशोक बाबर, महादेव कराळे, जालिंदर बोरुडे, गोरख पडोळे, भाऊसाहेब पांडुळे, सुजित काकडे, अशोक दहिफळे, अलका मुंदडा, गौरव बोरुडे, विष्णू फुलसौंदर, विशाल पवार, प्रदीप बोरुडे, गोरख बोरुडे, अमित घाडगे, सुमित लोंढे यांच्यासह नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. अमित घाडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विष्णू फुलसौंदर यांनी मानले.


जिल्हा सैनिक कल्याण अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल लेफ्टनंट कर्नल डॉ. सर्जेराव नागरे यांचा सन्मान करताना स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे. समवेत अमित खामकर, डॉ. अर्चना नागरे, वैष्णव नागरे, अर्णव नागरे आदी.

# जिल्हा सैनिक कल्याण अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल डॉ.सर्जेराव नागरे यांचा सत्कार

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी वर्ग–१ या पदावर निवड झाल्याबद्दल लेफ्टनंट कर्नल डॉ. सर्जेराव नागरे यांचा स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे सन्मानपत्र व शाल देऊन गौरव करण्यात आला.

स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते डॉ. नागरे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी मारुतीराव मिसळवालेचे संचालक अमित खामकर, डॉ. अर्चना नागरे, वैष्णव नागरे, अर्णव नागरे आदी उपस्थित होते.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, लेफ्टनंट कर्नल डॉ. सर्जेराव नागरे यांची एमपीएसीमार्फत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी या वर्ग–१ पदावर झालेली निवड ही अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब आहे. सैन्यसेवेनंतर प्रशासकीय क्षेत्रातही देशसेवा आणि समाजसेवेची संधी त्यांना मिळाली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा लाभ होईल. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.


भिमाशंकर येथे स्वच्छता अभियानासह वृक्षारोपण करताना नगरच्या हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य.

# हरदिन मॉर्निंग ग्रुपचे भिमाशंकर व ओझर येथे स्वच्छता अभियानासह वृक्षारोपण

नगर – वर्षभर पर्यावरण संवर्धन, आरोग्य जनजागृती आणि सामाजिक उपक्रमांद्वारे शहरात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सदस्यांसाठी पुणे जिल्ह्यातील पवित्र भिमाशंकर ज्योतिर्लिंग तसेच अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझर येथील श्री विघ्नहर गणपती दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत धार्मिक पर्यटनाबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दोन्ही मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले आणि भिमाशंकर परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

भिमाशंकरच्या निसर्गरम्य वातावरणात सर्व सदस्यांनी भगवान शंकराचे दर्शनानंतर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवत प्लास्टिक व इतर टाकाऊ कचरा गोळा करून स्वच्छतेचा संदेश दिला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यानंतर सदस्यांनी अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझर येथील गणपतीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर तेथेही मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून भाविकांना स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. धार्मिक स्थळांचे पावित्र्य राखणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि निसर्गाचे जतन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

हरदिन मॉर्निंग ग्रुप गेल्या अनेक वर्षांपासून नियमित वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्यविषयक जनजागृती, सामाजिक सेवा आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमात संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्यासह जहीर सय्यद, सचिन चोपडा, दिलीप गुगळे, दिलीप ठोकळ, सरदारसिंग परदेशी, विकास भिंगारदिवे, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, विलास आहेर, मनोहर दरवडे, रतन मेहेत्रे, दीपक घोडके, सुधीर कपाळे, अविनाश जाधव, सुभाष पेंढूरकर, इंजि. अनिल सोळसे, प्रकाश देवळालीकर, दीपक घाडगे, अशोक लोंढे, शिरीष पोटे, रामनाथ गर्जे, राजू शेख, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, सुहास देवराईकर, सखाराम अळकुटे, विठ्ठल निमसे, योगेश चौधरी, राजेश तनपुरे, कुमार धतुरे, शशिकांत पवार, अनिल हळगावकर, मच्छिंद्र बेरड, महादेव ढाकणे, सिद्धू बेरड, राजकुमार मोरे, संतोष चोपडा आदी सदस्य मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

# तुर्कस्तान, बेल्जियम, डेन्मार्क आणि हंगेरीच्या युवा प्रतिनिधींनी अनुभवली भारतीय कुटुंबव्यवस्था, संस्कृती, परंपरा व सेवाभाव

## लायन्स इंटरनॅशनल युवा देवाणघेवाण कार्यक्रम; २३ दिवस केली भारत भ्रमंती


लायन्स इंटरनॅशनल युवा देवाणघेवाण कार्यक्रमात अहिल्यानगरात आलेल्या चार परदेशी युवकांनी भारतीय पोषाख परिधान करीत भारतीय परंपरांची अनुभूती घेतली.

नगर – भारतीय संस्कृतीतील अतिथी देवो भव या मूल्याचा जिवंत अनुभव देणारा लायन्स इंटरनॅशनल युवा देवाणघेवाण कार्यक्रम सध्या महाराष्ट्रात उत्साहात सुरू असून, जगातील विविध देशांतील ३८ युवा प्रतिनिधी भारतात दाखल झाले आहेत. या प्रतिनिधींमध्ये चार युवा प्रतिनिधी अहिल्यानगरात, तीन प्रतिनिधी पुण्यात, तर उर्वरित प्रतिनिधी मुंबईतील लायन्स सदस्यांच्या कुटुंबात वास्तव्यास असून, भारतीय संस्कृती, परंपरा, कुटुंबव्यवस्था आणि सेवाभावाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत.

या संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वयन लायन्स मल्टिपल डिस्ट्रिक्टचे यूथ एक्स्चेंज चेअरमन लायन दिपेश जोशी (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, अहिल्यानगरातील आयोजनाची जबाबदारी लायन्स क्लब ऑफ अहमदनगरने यशस्वीपणे पार पाडली आहे. अहिल्यानगरात वास्तव्यास असलेले चार युवा प्रतिनिधी म्हणजे तुर्कस्तानची अभिनेत्री डेफ्ने एर्सेन, बेल्जियमची ईव्हा–लुना बेलॉय, डेन्मार्कचा एलियट केलर लॉरिट्झेन आणि हंगेरीचा फाबोक मॅत्यास हे होत. विविध संस्कृती, भाषा आणि परंपरा घेऊन आलेल्या या युवकांनी अल्पावधीतच भारतीय जीवनशैलीशी एकरूप होत अहिल्यानगरकरांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले.

२३ दिवसांच्या या आंतरराष्ट्रीय युवा देवाणघेवाण कार्यक्रमात पहिल्या ११ दिवसांसाठी प्रतिनिधींना भारतीय यजमान कुटुंबात राहण्याची संधी देण्यात आली. या कालावधीत त्यांनी भारतीय कुटुंबव्यवस्था, संस्कृती, खाद्यपरंपरा, सण–उत्सव आणि दैनंदिन जीवनशैलीचा जवळून अनुभव घेतला. त्यानंतर सर्व ३८ प्रतिनिधी दिल्ली, जयपूर आणि आग्रा या ऐतिहासिक शहरांच्या अभ्यासदौऱ्यावर जाणार असून, कार्यक्रमाच्या शेवटच्या पाच दिवसांत मुंबई येथे आयोजित आंतरराष्ट्रीय युवा शिबिरात सहभागी होऊन भारतातील अनुभव मांडणार आहेत. तसेच आपल्या–आपल्या देशांची संस्कृती, परंपरा आणि वैशिष्ट्येही ते सादर करणार आहेत.

अहिल्यानगरातील वास्तव्यात डेफ्ने एर्सेन या हरजीतसिंग वाधवा यांच्या कुटुंबात, ईव्हा–लुना बेलॉय या सी. ए. राजेंद्र काळे यांच्या कुटुंबात, एलियट केलर लॉरिट्झेन हे लायन सुनील छाजेड यांच्या कुटुंबात, तर फाबोक मॅत्यास हे लायन किरण भंडारी यांच्या कुटुंबात राहिले. काही दिवसांतच हे प्रतिनिधी पाहुणे न राहता त्या–त्या कुटुंबातील सदस्य बनले. भारतीय कुटुंबव्यवस्थेतील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी आणि एकमेकांप्रती असलेली आत्मीयता त्यांनी मनापासून अनुभवली.

अहिल्यानगरातील मुक्कामादरम्यान या युवा प्रतिनिधींनी आषाढी एकादशी दिंडीत सहभाग घेतला, स्थानिक महिलांसोबत फुगडी खेळली, तालयोगी यांच्या मार्गदर्शनाखाली गणपती ढोल वाजविण्याचा अनुभव घेतला तसेच भारतीय पोळी (रोटी) बनविणेही शिकले. त्यांनी उत्साहाने मराठी, हिंदी आणि पंजाबी भाषेतील दैनंदिन शब्द, अभिवादन आणि संवाद शिकून स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न केला. भारतीय संस्कृती आणि इतिहासाची ओळख करून घेण्यासाठी त्यांनी ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर, गुरुद्वारा भाई दयासिंगजी, अवतार मेहेरबाबा समाधीस्थळ, आनंदधाम, शिर्डी, श्री शनिशिंगणापूर, साई तीर्थ, जागतिक वारसा स्थळ वेरूळ लेणी, पुण्यातील शनिवारवाडा, आगाखान पॅलेस तसेच मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया आणि ताज महाल पॅलेस हॉटेल यांसारख्या ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांना भेटी देत भारताच्या समृद्ध वारशाचा जवळून अनुभव घेतला.

या दौऱ्यातील सर्वाधिक भावनिक आणि प्रेरणादायी अनुभव त्यांना गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या घर घर लंगर सेवा प्रकल्पात आला. दररोज शेकडो गरजूंना प्रेमाने तयार केलेले ताजे अन्न वाटण्याची सेवा पाहून ते भारावून गेले. सेवा हीच सर्वोच्च मानवता हा शीख धर्माचा संदेश त्यांनी प्रत्यक्ष अनुभवला आणि भारतीय समाजातील निःस्वार्थ सेवाभावाला मनापासून दाद दिली. युवा प्रतिनिधींनी रामकृष्ण ज्युनिअर कॉलेज व शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. त्यांनी आपल्या देशातील शिक्षणपद्धती, संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्याचबरोबर भारतीय विद्यार्थ्यांकडून भारताची संस्कृती, शिक्षणव्यवस्था आणि सामाजिक मूल्यांविषयी जाणून घेतले. या संवादातून परस्पर आदर, जागतिक मैत्री आणि बंधुभाव अधिक दृढ झाला.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या पदग्रहण समारंभात चारही प्रतिनिधींनी भारतातील आपल्या अनुभवांविषयी मनोगत व्यक्त केले. भारतीय कुटुंबव्यवस्थेतील प्रेम, वडीलधाऱ्यांप्रती आदर, अध्यात्म, स्वयंसेवेची परंपरा आणि भारतीय पाहुणचार याबद्दल त्यांनी विशेष कौतुक व्यक्त केले. आम्ही भारतात पर्यटक म्हणून आलो होतो; पण आता आम्हाला दुसरे कुटुंब मिळाले असून, आयुष्यभरासाठी जपण्यासारख्या आठवणी घेऊन परत जात आहोत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांचे हे मनोगत ऐकताना अनेक उपस्थित भावूक झाले आणि टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत करण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमासाठी आदित्य छाजेड, गुरनूरसिंग वाधवा, सई काळे, दिपेश कोठारी, डॉ. सिमरनकौर वाधवा, प्रणिता भंडारी आणि भावना छाजेड यांनी निवास, प्रवास, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच दैनंदिन समन्वयाची जबाबदारी अत्यंत आत्मीयतेने पार पाडली. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, सचिव हरीश हरवानी आणि कोषाध्यक्ष विजय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. तसेच माजी अध्यक्ष संजय आसनानी, प्रशांत मुनोत, दिलीप कुलकर्णी आणि धनंजय भंडारे यांचेही या उपक्रमासाठी मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

# अर्थजगत

■ कररचना




## छोटीशी चूक, मोठा दंड

**बँक खात्यात पुरेशी शिल्लक नसल्यास तुमची एसआयपी किंवा ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी होऊ शकतो. अशा वेळी बँक ईसीएसआरटीएन (इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस रिटर्न) शुल्क म्हणून २५० ते ५०० रुपयांपर्यंत दंड आकारू शकते. त्यामुळे म्युच्युअल फंड गुंतवणूकदार आणि कर्जाचा ईएमआय भरणाऱ्या ग्राहकांवर थेट परिणाम होतो. सध्या भारतात ८ कोटींहून अधिक गुंतवणूकदार एसआयपीद्वारे गुंतवणूक करतात, तर कोट्यवधी नागरिक विविध कर्जांचे ईएमआय भरतात.**

जर तुम्ही दर महिन्याला म्युच्युअल फंडात एसआयपीद्वारे गुंतवणूक करत असाल किंवा कोणत्याही कर्जाचा ईएमआय भरत असाल, तर बँक स्टेटमेंटमध्ये ईसीएसआरटीएन असा उल्लेख दिसणे ही चिंतेची बाब ठरू शकते. ईसीएसआरटीएन म्हणजे इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस रिटर्न. खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास बँक हा दंड आकारते. हा दंड २५० ते ५०० रुपयांपर्यंत असू शकतो आणि त्यावर १८ टक्के जीएसटी वेगळा आकारला जातो.

तुमच्या पुढील एसआयपीची तारीख जवळ आली असेल, तर वेळेवर बँक खात्यातील शिल्लक तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास बँक आणि म्युच्युअल फंड संस्था स्वतंत्रपणे दंड आकारू शकतात. त्यामुळे दर महिन्याच्या बचतीवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

**बँक हा दंड का आकारते?**

इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस (ईसीएस) किंवा नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (एनएसीएच) या सुविधांद्वारे दर महिन्याला ठरावीक तारखेला तुमच्या बँक खात्यातून एसआयपी, कर्जाचा ईएमआय किंवा विविध बिलांची रक्कम आपोआप वजा केली जाते.

मात्र, व्यवहाराच्या दिवशी खात्यात पुरेशी शिल्लक नसल्यास बँक हा व्यवहार नाकारते. या नाकारलेल्या किंवा अयशस्वी झालेल्या व्यवहारालाच बँकिंग भाषेत ईसीएसआरटीएन (ईसीएस रिटर्न) असे म्हणतात.

प्रत्येक वेळी ऑटो-डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास बँक प्रक्रिया शुल्काच्या नावाखाली दंड आकारते.

उदाहरणार्थ, १,००० ची एसआयपी बाऊन्स झाल्यास तुम्हाला ३०० ते ५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त आर्थिक फटका बसू शकतो. पूर्वीच्या तुलनेत ही प्रणाली आता अधिक कठोर झाली आहे.

जर तुमच्या एकापेक्षा अधिक एसआयपी किंवा ईएमआय एकाच दिवशी बाऊन्स झाले, तर बँक प्रत्येक व्यवहारासाठी स्वतंत्र ईसीएसआरटीएन शुल्क आकारते. त्यामुळे एका दिवसातच १,००० ते २,००० पर्यंतचा अतिरिक्त खर्च होऊ शकतो.

ऑटो-डेबिट व्यवहार कर्जाच्या किंवा क्रेडिट कार्डच्या ईएमआयशी संबंधित असेल, तर तो अयशस्वी झाल्यास तुमच्या सिबिल (सीआयबीआयएल) गुणांकनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

सलग ३ महिने एसआयपी बाऊन्स झाल्यास म्युच्युअल फंड कंपन्या तुमची एसआयपी बंद करण्याचा निर्णय घेऊ शकतात.




## वारंवार युपीआय वापरल्यास नोटीस येते का?

आजच्या डिजिटल युगात आपले जीवन पूर्णपणे बदलले आहे. भाजीवाल्याला २० रुपये देण्यापासून ते कोणालाही लाखो रुपये पाठवण्यापर्यंत आपण प्रत्येक कामासाठी फोनपे, गूगल पे, युपीआय, एनईएफटी, आरटीजीएस किंवा आयएमपीएस यांसारख्या डिजिटल पेमेंट पद्धतींचा मोठ्या प्रमाणात वापर करतो. चिमूटभर वेळात पैसे पाठवणे अत्यंत सोपे झाले आहे. परंतु, याच सुलभतेमुळे लोकांच्या मनात एक भीती देखील निर्माण झाली आहे. वारंवार ऑनलाइन व्यवहार केल्यास किंवा जास्त पैसे पाठवल्यास किंवा मागवल्यास आयकर विभागाची नोटिस येऊ शकते का, असा प्रश्न अनेकांना पडतो.

करतज्ज्ञांचे म्हणणे आहे की, लोकांमध्ये सर्वात मोठा गैरसमज हा आहे की त्यांच्या प्रत्येक लहान-मोठ्या युपीआय व्यवहारावर आयकर अधिकारी थेट नजर ठेवून असतात. पण तसे अजिबात नाही. केवळ डिजिटल माध्यमातून पैसे पाठवल्याने किंवा घेतल्याने आयकर विभागाची नोटिस येत नाही.

आयकर विभाग सामान्य नागरिकाच्या प्रत्येक लहान-मोठ्या व्यवहारावर लक्ष ठेवत नाही. यासाठी एक निश्चित आणि व्यवस्थित यंत्रणा अस्तित्वात आहे. बँक आणि इतर संस्था विशिष्ट नियमांनुसार 'स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन्स' सरकारला पाठवतात. जेव्हा एखादा व्यवहार ठरवलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतो, तेव्हाच हा अहवाल सादर केला जातो. म्हणजेच आपले व्यवहार सामान्य मर्यादेत असतील, तर घाबरण्याचे कोणतेही कारण नाही.

आयकर विभाग काही विशिष्ट प्रकारच्या मोठ्या व्यवहारांवर आणि पॅटर्नवर बारीक लक्ष ठेवतो.

❋ तुम्ही आपल्या बचत खात्यात एका आर्थिक वर्षात दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक रोख जमा केले, तर बँक याची माहिती आयकर विभागाला देते.

❋ चालू खात्यामध्ये पन्नास लाख रुपये किंवा त्याहून अधिक रोख जमा केल्यास किंवा काढल्यास त्यावर नजर ठेवली जाते.

❋ तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्डचे बिल रोख स्वरूपात एक लाख रुपयांपेक्षा जास्त भरले किंवा कोणत्याही माध्यमातून वर्षभरात एकूण दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक पेमेंट केले, तर त्याची नोंद होते.

❋ दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक रकमेची मुदत ठेव, शेअर्स, म्युच्युअल फंड, बाँड किंवा डिबेंचर खरेदी करणे आणि तीस लाख रुपयांपेक्षा जास्त संपत्तीची खरेदी-विक्री थेट एसएफटीच्या कक्षेत येते.

आजआयकर विभाग पूर्वीपेक्षा अधिक प्रगत झाला आहे. 'प्रोजेक्ट इन्साइट'च्या माध्यमातून पूर्णपणे डेटाच्या आधारे काम करतो. कर चोरी रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंगचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे पैसे कसे आणि कोठून फिरवले जातात हे समजणे शक्य झाले आहे.

---

**नेपाळमध्ये झालेल्या एका अपघातानंतर विमा कंपनीचे म्हणणे होते की, अपघात परदेशात झाल्यामुळे विमा पॉलिसी लागू होत नाही आणि नुकसानभरपाई देण्याची त्यांची जबाबदारी नाही. सर्वोच्च न्यायालयाने मोटर इन्शुरन्सशी संबंधित एका महत्त्वाच्या प्रकरणात स्पष्ट केले आहे की, जर कोणत्याही विमा पॉलिसीमध्ये स्पष्टपणे हे लिहिलेले नसेल की भारताबाहेर होणारे अपघात कव्हर केले जाणार नाहीत, तर केवळ या कारणावरून क्लेम फेटाळला जाऊ शकत नाही. न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, पॉलिसीच्या अटींमध्ये कोणतीही अस्पष्टता असेल, तर त्याचा फायदा विमा कंपनीला मिळू शकत नाही.**

## देशाबाहेर अपघात झाला तरी नुकसान भरपाई मिळणार

सर्वोच्च न्यायालयाच्या द्विपक्षीय खंडपिठाने ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची याचिका फेटाळून लावत हा निर्णय दिला. हे प्रकरण सन २०१० चे आहे.

नेपाळमध्ये एका बस अपघातात हरीश यादवसह तीन लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मोटर अपघात दावा न्यायाधिकरणने पीडितांच्या कुटुंबीयांना ३२ लक्ष ६७ हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले होते. तसेच, २०११ पासून या रकमेवर सहा टक्के वार्षिक व्याज देण्यास सांगितले होते. सुरुवातीला न्यायाधिकरणाने नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी वाहन मालकावर टाकली होती. मात्र, नंतर छत्तीसगड उच्च न्यायालयाने म्हटले की हे पैसे विमा कंपनीलाच द्यावे लागतील. आता सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा हा निर्णय कायम ठेवला आहे.



ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध दुर्ग रोडवेज प्राइवेट लिमिटेड प्रकरणात विमा कंपनीचे म्हणणे होते की, अपघात नेपाळमध्ये झाला असल्यामुळे विमा पॉलिसी लागू होत नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला नाही. न्यायालयाने म्हटले की, कंपनीला भारताबाहेर होणारे अपघात पॉलिसीच्या कक्षेतून बाहेर ठेवायचे असतील, तर ती गोष्ट पॉलिसीच्या अटींमध्ये स्पष्ट शब्दांत लिहिली पाहिजे होती. न्यायालयाने असेही सांगितले की, ज्या बसचा अपघात झाला, ती सर्व आवश्यक परवानगी घेऊन आणि नियमांचे पालन करून कायदेशीर मार्गाने नेपाळमध्ये गेली होती. त्यामुळे दुर्घटना देशाबाहेर झाली असे म्हणून क्लेम नाकारता येणार नाही.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने विमा कंपन्यांच्या कार्यपद्धतीवरही कडक टिप्पणी केली. न्यायालयाने म्हटले की, कंपन्या आपल्या पॉलिसीमध्ये काय कव्हर करावे आणि काय नाही, हे ठरवण्याचा अधिकार ठेवतात, परंतु सर्व अटी पूर्णपणे स्पष्ट असल्या पाहिजेत. न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, जर पॉलिसीच्या अटी नीट लिहिल्या गेल्या नसतील, तर त्याचे नुकसान विमा कंपनीला सहन करावे लागू शकते. विम्याचे करार कंपन्या स्वतः तयार करतात, त्यामुळे त्यांची भाषा अशी असली पाहिजे जी सामान्य ग्राहकाला सहज समजेल.

या निर्णयाचा प्रभाव केवळ मोटार इन्शुरन्सपुरता मर्यादित राहणार नाही, तर आरोग्य, ट्रॅव्हल आणि प्रॉपर्टी इन्शुरन्सशी संबंधित प्रकरणांमध्येही याचा परिणाम दिसून येऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने सुचवले की, इरडाने सर्व मोटर विमा पॉलिसींमध्ये सीमापार संरक्षणाशी संबंधित नियम एकसारखे बनवावेत आणि पॉलिसीच्या सर्व अटी ग्राहकांना सोप्या भाषेत सांगितल्या जाव्यात याची खात्री करावी.

---

## तीन वर्षांच्या आत 'नवीन घर' विकले आहे?

जर तुम्ही जुने घर किंवा इतर मालमत्ता विकून आयकर कायद्यातील कलम ५४ किंवा ५४ एफ अंतर्गत भांडवली नफ्यावर करसवलत घेतली असेल आणि त्यानंतर खरेदी केलेले नवीन घर ३ वर्षांच्या आत विकले, तर ही सवलत रद्द होऊ शकते. अशा परिस्थितीत करदात्याला अतिरिक्त कर, व्याज आणि दंडाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आकलन वर्ष २०२६-२७ साठी आयकर विवरणपत्र दाखल करताना योग्य पद्धतीने कराची गणना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आयकर कायदा, १९६१ मधील कलम ४५ नुसार घर किंवा इतर भांडवली मालमत्ता विक्रीतून मिळणाऱ्या भांडवली नफ्यावर कर आकारला जातो. मात्र, विशिष्ट अटी पूर्ण केल्यास कलम ५४ किंवा कलम ५४ एफ अंतर्गत या करातून सूट मिळू शकते. अनेक करदाते करबचतीसाठी नवीन घर खरेदी करून ही सवलत घेतात; परंतु त्यानंतर आवश्यक असलेला ३ वर्षांचा लॉक-इन कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच ते घर विकून टाकतात. अशा वेळी आधी मिळालेली करसवलत मागे घेतली जाते.



यामुळे केवळ अतिरिक्त कर भरावा लागतो असे नाही, तर आयकर विवरणपत्रात योग्य माहिती न दिल्यास आयकर विभागाकडून प्रकरणाची छाननी होऊ शकते. त्यातून कराची अतिरिक्त मागणी, व्याज तसेच दंडाची नोटीसही मिळू शकते.

■ **कलम ५४ म्हणजे काय?**

कलम ५४ ही सवलत अशा करदात्यांसाठी आहे, ज्यांनी निवासी घर विकले असून त्यातून झालेल्या दीर्घकालीन भांडवली नफ्याची रक्कम ठरावीक कालावधीत दुसऱ्या निवासी घराच्या खरेदी किंवा बांधकामासाठी वापरली आहे. अशा वेळी पात्रतेनुसार भांडवली नफ्यावर करसवलत मिळते.

■ **कलम ५४ एफ म्हणजे काय?**

कलम ५४ एफ हे अशा प्रकरणांसाठी लागू होते, जिथे करदाता निवासी घराव्यतिरिक्त इतर दीर्घकालीन भांडवली मालमत्ता विकतो आणि मिळालेली रक्कम नवीन निवासी घर खरेदी किंवा बांधण्यासाठी वापरतो. आवश्यक अटी पूर्ण झाल्यास या कलमान्वयेही करसवलत मिळू शकते.

■ **तीन वर्षांच्या आत नवीन घर**

**विकल्यास काय होते?**

जर करदात्याने कलम ५४ किंवा ५४ एफ अंतर्गत करसवलत घेतल्यानंतर खरेदी केलेले नवीन घर ३ वर्षांच्या आत विकले, तर त्याला पूर्वी मिळालेली करसवलत कायम राहत नाही.

अशा परिस्थितीत नवीन घराची खरेदी किंमत ठरवताना पूर्वी मिळालेल्या करसवलतीची रक्कम त्या किमतीतून वजा केली जाते. त्यामुळे विक्रीवेळी करपात्र भांडवली नफा वाढतो आणि त्यावर अधिक कर भरावा लागू शकतो.

**चुकीचा आयटीआर भरल्यास काय परिणाम होऊ शकतात?**

◆ जर करदात्याने ३ वर्षांच्या आत नवीन घर विकूनही त्याचा योग्य करपरिणाम आयकर विवरणपत्रात दाखवला नाही, तर आयकर विभागाकडून खालील कारवाई होऊ शकते.
◆ प्रकरणाची छाननी
◆ अतिरिक्त कराची मागणी
◆ करावरील व्याज
◆ लागू असल्यास दंड
◆ नोटीस जारी होण्याची शक्यता
◆ म्हणूनच करसवलतीचा लाभ घेतल्यानंतर नवीन घर विक्रीसंदर्भातील व्यवहार आयटीआरमध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

■ **करदात्यांसाठी महत्त्वाचा सल्ला**

कलम ५४ आणि ५४ एफ अंतर्गत मिळणारी करसवलत ही अटींसह दिली जाते. त्यातील सर्वात महत्त्वाची अट म्हणजे नवीन घर किमान ३ वर्षे कायम ठेवणे. हा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी घर विकल्यास आधी मिळालेली करसवलत रद्द होऊ शकते आणि त्याचा थेट परिणाम करदायित्वावर होतो. त्यामुळे ३१ जुलै २०२६ पूर्वी आयकर विवरणपत्र दाखल करताना अशा सर्व व्यवहारांची योग्य नोंद करणे, कराची अचूक गणना करणे आणि आवश्यक असल्यास करसल्लागाराचा सल्ला घेणे हितावह ठरेल.

**काय तपासावे?**

◆ पूर्वी कलम ५४ किंवा ५४ एफ अंतर्गत करसवलत घेतली होती का?
◆ त्या सवलतीनंतर खरेदी केलेले नवीन घर ३ वर्षांच्या आत विकले आहे का?
◆ विक्रीमुळे करसवलत मागे घेण्याची वेळ आली आहे का?
◆ सुधारित भांडवली नफ्याची योग्य गणना केली आहे का?
◆ आयटीआरमध्ये सर्व माहिती अचूकपणे नमूद केली आहे का?

---




## आयटीआर भरणा करताना अधिक तपशील द्यावा लागणार

आर्थिक वर्ष २०२५-२६ (मूल्यांकन वर्ष २०२६-२७) साठीच्या नव्या आयकर विवरणपत्र (आयटीआर) फॉर्म्समध्ये विभागाने विविध सवलती आणि वजावटींच्या दाव्यांसाठी अधिक तपशीलवार माहिती मागितली आहे.

■ **ही अतिरिक्त माहिती का महत्त्वाची आहे?**

कर कायद्यातील बदलांनुसार, विभागाला सवलती आणि वजावटींच्या दाव्यांची पडताळणी अधिक सोप्या व पारदर्शक पद्धतीने करता यावी, यासाठी ही माहिती मागवली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, यामुळे आकडेवारीच्या आधारे पडताळणी शक्य होऊन खोटे किंवा फुगवलेले दावे रोखता येतील.

■ **पडताळणी कशी होणार?**

व्यवहाराचा संदर्भ क्रमांक आणि आयएफएससी कोड दिल्यास, विभाग नियोक्ता, बँका, विमा कंपन्या आणि इतर संस्थांकडून मिळालेल्या माहितीशी दाव्यांची पडताळणी करू शकेल. यामुळे खोटे दावे लवकर ओळखले जातील, तर अचूक माहिती दिल्यास रिटर्न प्रोसेसिंग आणि रिफंड जलद होईल.

■ **एचआरए वरील सवलत**

❖ कलम १०(१३)अ अंतर्गत एचआरए सवलतीचा दावा करताना करदात्याला निवासस्थान, मिळालेला एचआरए, भरलेले भाडे आणि पगाराचा तपशील द्यावा लागेल. ❖ एचआरए तपशील फॉर्म १६ आणि भाड्याच्या नोंदींशी जुळायला हवा. ❖ वार्षिक १ लाख रुपयांपेक्षा जास्त भाडे दिल्यास घरमालकाचा पॅन क्रमांक द्यावा लागेल. ❖ स्वतःचा व्यवसाय असल्यास किंवा एचआरए पगाराचा भाग नसल्यास ही सवलत मिळत नाही (अशा वेळी कलम ८० जी जी लागू होऊ शकते). ❖ स्वतःच्याच घरात राहणाऱ्यांना ही सवलत मिळत नाही.

■ **गृहकर्जावरील व्याज सवलत**

❖ कलम २४(ब) अंतर्गत दावा करताना कर्ज बँकेकडून की अन्य स्रोताकडून घेतले, हे नमूद करावे लागेल. ❖ दाव्यातील व्याजाची रक्कम कर्जदात्याच्या व्याज प्रमाणपत्राशी जुळायला हवी. ❖ घर स्वतः वापरात आहे, भाड्याने दिले आहे, की भाड्याने दिले मानले जाते हे स्पष्ट करावे लागेल. ❖विभाग हा दावा कर्जदात्याचे रेकॉर्ड, फॉर्म १६, एआयएस आणि फॉर्म २६एएसशी पडताळतो.

**चुका अशा टाळाव्यात**

चुकीचा पॅन किंवा व्यवहार संदर्भ क्रमांक, दुहेरी दावे आणि प्री-फिल्ड माहितीवर पडताळणीशिवाय विश्वास ठेवणे ह्र या सामान्य चुका आहेत. किरकोळ चूक किंवा अपूर्ण माहितीमुळे फॉर्म नाकारला जाऊ शकतो, डिफेक्टिव्ह रिटर्नची नोटीस येऊ शकते किंवा दंडही होऊ शकतो

❖ आवश्यक तपशील: कर्जदात्याचे नाव, कर्ज खाते क्रमांक, मंजुरीची तारीख, रक्कम, थकबाकी आणि दाव्याची रक्कम.

■ **कलम ८०सी अंतर्गत दावे**

**गुंतवणूक किंवा भरणा प्रकारानुसार तपशील द्यावा लागेल:** जीवन विमा ह्र पॉलिसी क्रमांक, पीपीएफ, ईएलएसएस, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र ह्र खाते/दस्तऐवज संदर्भ क्रमांक, ट्यूशन फी व गृहकर्ज मुद्दल परतफेड ह्र संबंधित कागदपत्रे.

**कलम ८० डी अंतर्गत दावे**

आरोग्य विमा वजावटीसाठी विमाधारकाचे नाव, विमा कंपनी, पॉलिसी क्रमांक, भरलेला हप्ता, भरण्याची पद्धत आणि पुरावा जपून ठेवावा.

रोख ऐवजी ऑनलाइन/कार्डद्वारे हप्ता भरणे सुरक्षित, स्वतः, जोडीदार, आश्रित मुले किंवा पालकांच्या मेडिक्लेमवर सवलत मिळते (पालकांसाठी वेगळी मर्यादा). नोंदणीकृत विमा कंपनीकडून टॉप-अप/सुपर टॉप-अप विम्यावरही सवलत मिळते.

■ **कलम ८०जी आणि ८० जीजीसी अंतर्गत दावे**

राजकीय पक्ष किंवा इलेक्टोरल ट्रस्टला दिलेल्या देणगीसाठी संस्थेचे नाव व पॅन द्यावा लागतो.

देणगी फक्त बँकेमार्फत द्यावी रोख देणगीवर सवलत नाही.

देणगी घेणारी संस्था कलम ८० जी अंतर्गत नोंदणीकृत आहे का, हे तपासावे.

नव्या फॉर्ममध्ये देणगीदाराचा तपशील, पॅन, पत्ता, भरण्याची पद्धत आणि पावती क्रमांक द्यावा लागतो.

■ **रिटर्न भरण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवा**

फॉर्म १६, फॉर्म २६एएस, एआयएस, टीआयएस, बँक स्टेटमेंट, वजावटीचे पुरावे, कॅपिटल गेन्स स्टेटमेंट, कर्ज प्रमाणपत्र आणि देणगीच्या पावत्या..

---

## किमान शिल्लक रकमेचा विळखा




केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार, देशातील बँकांनी केवळ गेल्या चार आर्थिक वर्षांत किमान शिल्लक न ठेवल्याच्या दंडापोटी ग्राहकांकडून तब्बल २६ हजार १०० कोटींहून अधिक रुपयांची वसुली केली आहे! यामध्ये खासगी बँका आघाडीवर असून, त्यांनी सामान्य ग्राहकांच्या खिशाला मोठा कात्री लावली आहे.

बँका खाते उघडताना अत्यंत गोड बोलून आकर्षक योजनांची माहिती देतात. आमच्याकडे खाते उघडा, झटपट सेवा मिळवा, असे सांगितले जाते. परंतु, खात्याच्या नियमावलीत बारीक अक्षरांमध्ये किमान शिल्लक रकमेची अट घातलेली असते. शहरांनुसार ही मर्यादा पाच हजार रुपयांपासून ते दहा हजार रुपयांपर्यंत किंवा त्याहून अधिक असू शकते.

ही रक्कम रोजच्या रोज खात्यात असणे आवश्यक नाही, तर संपूर्ण महिन्याची 'सरासरी मासिक शिल्लक' काढावी लागते. खात्यातील सरासरी रक्कम ठरलेल्या मर्यादेपेक्षा अगदी थोडी जरी कमी झाली, तर बँक सरळ खात्यातून दंड कापून घेते. जेव्हा ग्राहकाच्या खात्यात आधीच पैसे नसतात, तेव्हा बँक दंड कापून उरलेली शिल्लक आणखीनच खालावते. यामुळे गरीब वर्ग, शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय नागरिक अधिक अडचणीत येतात.

सार्वजनिक क्षेत्रातील (सरकारी) बहुतांश बँकांनी ग्राहकांच्या वाढत्या रोषामुळे बचत खात्यांवरील हा दंड रद्द केला किंवा शिथिल केला आहे. परंतु, खासगी बँकांचे धोरण अजूनही सामान्यांच्या खिशाला भगदाड पाडणारे आहे.

यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे बँकेच्या या नियमाचे गणित सामान्यांना कधीच उलगडत नाही किंवा ते प्रयत्नही करत नाहीत. बँक तुमच्या खात्यावर दंड आकारण्यापूर्वी एक गणित करते, जे तुम्हीही तुमच्या पासबुक किंवा मोबाईल बँकिंग ॲपवरून पडताळू शकता.

महिन्यातील प्रत्येक दिवसाच्या अखेरीस तुमच्या खात्यात किती रक्कम होती, याची नोंद करा (किंवा स्टेटमेंट काढा). संपूर्ण ३० किंवा ३१ दिवसांच्या दैनंदिन शिल्लक रकमेची बेरीज करा. आलेल्या एकूण बेरीजेला महिन्यातील एकूण दिवसांच्या संख्येने (उदा. ३० किंवा ३१) भाग द्या. यानंतर जी रक्कम येईल, ती तुमची त्या महिन्याची सरासरी मासिक शिल्लक असेल. जर ही सरासरी रक्कम बँकेच्या ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा (उदा. ५,००० किंवा १०,००० रुपये) अगदी एक रुपयानेही कमी भरली, तर बँक तुमच्यावर दंड लादण्यासाठी पात्र ठरते.

**काय काळजी घ्याल?**

दर महिन्याला बँक स्टेटमेंट डाऊनलोड करून त्यात नॉन मेंटेनन्स चार्जेस किंवा सर्व्हिस चार्जेस नावाने कोणतीही कपात झाली आहे का, ते तपासा.

महिन्याच्या मधोमध एकदम सगळे पैसे काढून घेऊ नका. जर मोठी रक्कम काढायची असेल, तर हे लक्षात ठेवा की त्यामुळे उर्वरित दिवसांचे गणित बिघडू शकते.

जर बँकेने चुकीच्या पद्धतीने दंड कापला असल्याचे तुमच्या गणितानुसार निदर्शनास आले, तर त्वरित बँकेच्या शाखेत लिखित स्वरूपात अर्ज देऊन दाद मागावी. आरबीआयच्या नियमांनुसार, चुकीचे शुल्क आकारल्यास बँकांना ती रक्कम परतावी करावी लागते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल ठरत आहे गरजूंच्या आरोग्याचा आधार

## सौ. सविता फिरोदिया


आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन करताना सौ. सविताताई फिरोदिया, सीए रमेश फिरोदिया, साक्षी फिरोदिया, सीए आयपी अजय मुथा, निखीलेंद्र लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी, डॉ. स्वप्निल शिंदे आदी.

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवतेचे मंदिर असून, गरजूंच्या आरोग्याचा आधार ठरले आहे. हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत आहे. या सेवा कार्यात योगदान देताना समाधान आणि आनंद मिळतो. समाजाची गरज ओळखून हॉस्पिटलमध्ये नवनवीन सुविधा निर्माण केल्या जात आहेत. या सुविधा समाजाला अर्पण करून त्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत असल्याचे प्रतिपादन सौ. सविता रमेश फिरोदिया यांनी केले.

### हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरात १५० रुग्णांची मोफत तपासणी

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त सीए रमेश फिरोदिया व सौ. सविताताई फिरोदिया (फिरोदिया एज्युकेशन ट्रस्ट) यांच्या वतीने स्व. बदामबाई फिरोदिया यांच्या स्मरणार्थ हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सीए रमेश फिरोदिया, साक्षी फिरोदिया, सीए आयपी अजय मुथा, निखीलेंद्र लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी, डॉ. स्वप्निल शिंदे उपस्थित होते.

प्रास्ताविकात निखीलेंद्र लोढा यांनी फिरोदिया परिवाराच्या सामाजिक योगदानाचा गौरव केला. ते म्हणाले, 'शिका, कमवा आणि समाजाला परत द्या,' या तत्त्वावर फिरोदिया परिवाराचे जिल्ह्यात सामाजिक योगदान सुरू आहे. गेल्या १५ वर्षांत त्यांनी सामाजिक चळवळीत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अल्पदरात सिटीस्कॅन, एमआरआय मशीन तसेच ब्लड बँकेची सुविधा त्यांच्या आर्थिक योगदानामुळे शक्य झाली आहे.

सीए आयपी अजय मुथा म्हणाले की, आयुष्यात प्रगती करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून सीए रमेश फिरोदिया यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे सामाजिक कार्य उभे केले आहे. बिकट परिस्थितीत शिक्षण घेऊन ते सीए झाले. मुंबईत उत्तम यश मिळवल्यानंतरही सामाजिक बांधिलकी जोपासत ते पुन्हा आपल्या शहराशी व गावाशी जोडले गेले आणि सामाजिक योगदान देण्यास सुरुवात केली. आपल्या मूळ गावात त्यांनी महाविद्यालयाची स्थापना केली असून, त्यामध्ये ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. समाजाच्या प्रत्येक कार्यात योगदान देताना जैन सोशल फेडरेशनच्या सेवाकार्यातही त्यांचे सहकार्य लाभत आहे. शिक्षण, आरोग्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी मोठे कार्य केले असून, मानवसेवेच्या कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो, असे मुथा यांनी सांगितले.

डॉ. राहुल अग्रवाल म्हणाले की, कार्डियाक विभाग हा आनंदऋषीजी हॉस्पिटलचे हृदय आहे. उत्तम दर्जाची आरोग्यसेवा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवेमुळे हॉस्पिटलने भारतात नावलौकिक मिळवला आहे. आतापर्यंत १५ हजारांपेक्षा अधिक बायपास सर्जरी यशस्वी झाल्या असून, एक लाखांपेक्षा अधिक अँजिओप्लास्टी आणि अँजिओग्राफी झाल्याची माहिती त्यांनी दिली.

डॉ. अनिकेत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी विभागाची संपूर्ण टीम २४ तास कटिबद्ध राहून रुग्णांना सेवा देत आहे. उत्तम दर्जाची आरोग्यसेवा आणि तत्पर सेवेतून हॉस्पिटलने रुग्णांमध्ये मोठा विश्वास निर्माण केला आहे. पूर्वी महाराष्ट्रात हृदय शस्त्रक्रियेसाठीची केंद्रे कमी होती आणि त्यासाठीचा खर्चही सर्वसामान्यांना परवडणारा नव्हता. त्यामुळे समाजाची गरज लक्षात घेऊन आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कार्डियाक सेंटर उभारण्यात आले. या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी आरोग्यसेवेची दारे खुली करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

या हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरात १५० रुग्णांची हृदयरोग तपासणी करण्यात आली. शिबिरात केवळ ३ हजार रुपयांमध्ये अँजिओग्राफीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. तपासणीनंतर गरजेनुसार विविध हृदय शस्त्रक्रिया अल्पदरात करण्यात येणार आहेत. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार असल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर आभार माणकचंद कटारिया यांनी मानले.

# गुरुवाणी – १४



## कायम तारणारा 'नवकार महामंत्र'

आयुष्यात कोणत्याही कठीण प्रसंगी अथवा चांगल्या प्रसंगात श्रद्धेने केलेला नवकार महामंत्र जाप लाभदायक असतो. शारीरिक कष्ट असो की मानसिक त्रास, हा मंत्र उपयुक्त ठरतो. नवकार महामंत्र हा जैन धर्मातील सर्वात महत्त्वाचा मूलमंत्र आहे. यात अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि सर्व साधू अशा पाच परमेष्ठियांना नमस्कार केला आहे, ज्यांचे गुण स्मरण करणे माणसाला प्रगतीपथावर नेते. पंचपरमेष्ठींना नमन करणारा हा मंत्र सर्व पापांचा नाश करणारा आणि सर्व मंगलांमध्ये प्रथम मंगल आहे. नकारात्मकता दूर करणारा आहे. मंत्र सर्व पाप कर्मे नष्ट करणारा आणि आत्म्याला शुद्ध करणारा आहे. नियमित जपामुळे मन शांत होते आणि एकाग्रता वाढते. प्रत्येक नमन करताना संपूर्ण समर्पण भाव हवा. महामंत्रातील 'नमो अरिहंताणं' म्हणजे पूज्य अरिहंत तीर्थंकर. 'अरि' म्हणजे शत्रू आणि 'हंतनम्' म्हणजे जिंकणे. म्हणून या वंदनात आपण अरिहंत भगवंतांना वंदन करत आहोत, ज्यांनी क्रोध, अहंकार, कपट, लोभ, आसक्ती आणि तिरस्कार या सर्व आंतरिक शत्रूंवर विजय मिळवला आहे. जे मला शरण देतात, त्यांना नमन करणे. अरिहंत भगवान जिथे कुठेही असतील, मी त्यांना वंदन करतो. पूज्य भगवंतांमधील अनंत गुण, सिद्धी आहेत. त्या ग्रहण केल्या पाहिजेत. यासाठी 'नमो सिध्दाणं' हा मंत्र आहे. मी त्या सर्व भगवंतांना वंदन करतो, ज्यांनी अंतिम मुक्ती प्राप्त केली आहे. पंचपरमरेष्ठीमध्ये सर्वात जास्त शक्ती आहेत. तुम्ही श्रद्धेने नवकार महामंत्राचा जाप करता तेव्हा तुमच्यात अलौकिक शक्तीचा आश्रव होतो. तीर्थंकरांचे पुण्य ग्रहण करण्याची प्रक्रिया म्हणजे नवकार महामंत्र जाप. तीर्थंकर परमात्मांना मोक्ष प्राप्ती झाली असली तरी त्यांनी आपले पुण्य दान केले आहे. ते आपल्यात ग्रहण करणे यालाच मंत्र साधना म्हणतात. लयबद्ध पद्धतीने मंत्र जप केल्यावर वेगळीच अनुभूती स्वतःलाच येईल. नकारात्मकता नाहिशी होईल. मनातील पिडा, दुःख दूर होईल. पंचपरमरेष्ठीच्या शक्तीचा अनुभव घ्या. हे सर्व सायन्स आहे. तुम्हाला परमानंद नक्कीच मिळेल.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# गुरुवाणी – १५



## 'संवर' करायला शिका...

भगवान महावीरांनी अहिंसेची व्यापक अर्थाची शिकवण दिली. मच्छर मारण्यासाठी आपण विषारी साधने वापरतो. त्याने मच्छर मरतात म्हणजे हिंसा होते आणि तुमच्या शरीरातही विष जाते. मच्छरांपासून वाचण्यासाठी मच्छरदाणी वापरणे योग्य ठरते. याच पद्धतीने आपल्या पाचही इंद्रियांवर मच्छरदाणी लावली पाहिजे. मन अथवा इंद्रियांवर नियंत्रण ठेवण्याची क्रिया म्हणजे 'संवर' असते. महाभारतात श्रीकृष्णाला विचारण्यात आले, तुम्ही द्रौपदीचे रक्षण केले पण धर्मराजला द्युतात सर्वस्व हरण्यापासून का नाही वाचवले?. भगवान श्रीकृष्ण म्हणाले, दुर्योधनाला माहिती होते की, द्यूतात आपण जिंकणार नाही. म्हणून त्याने शकुनीला आपल्यावतीने खेळायला लावले. हे ओळखण्यात धर्मराज कमी पडला म्हणून द्युतात हरला. धर्मराजने आधी संरक्षणाची व्यवस्था केली नाही आणि वनवासात जावे लागले. धोका ओळखून संरक्षक कवच निर्माण करणे यालाच संवर म्हणतात. अनेक रोगांवर वापरण्यात येणारे व्हॅक्सिन, प्रती जैविक हे सुद्धा संवर आहे. तीर्थंकर महावीर सांगतात, ज्ञानी शिष्य व्हायचे असेल तर चांगल्या लोकांची संगत महत्त्वाची असते. समर्थ रामदासांनी 'मनाचे श्लोक' रचून संवरचेच महत्त्व अधोरेखित केले आहे. जीभ आणि मनाला बिघडवणारे कान असतात. त्यामुळे कानाने वाईट ऐकूच नका. कानाला संवर द्या. वाईट गोष्टी ऐकल्याच नाहीत, तर वाईट विचारही मनात येणार नाहीत. निंदा करणाऱ्यापेक्षा निंदा ऐकणारा जास्त दोषी असतो. ऐकणाराच नसेल तर निंदा करणारा शांत होतो. निंदकाला संजीवनी आपणच देतो. सर्वांचे मानसिक त्रास संवर नसल्यामुळे आहेत. जो माल बाजारात विकला जात नाही तो माल तयार केला जात नाही. वाईट गोष्टींना थाराच दिला नाही तर त्यांना किंमतच राहणार नाहीत. कचरा येण्यापासून रोखलाच नाही तर कितीही साफसफाई करून उपयोग नाही. गुरूदेवांनी समाजाला संवर दिला. हीच व्यवस्था गुरूदेवांच्या राजधानीत अहिल्यानगरमध्ये सर्वांना करायची आहे. गुरूदेवांच्या कृपेमुळे निर्माण झालेले अद्भुत वातावरण बिघडले नाही पाहिजे. यासाठी फक्त संवर करायचे आहे. गुरूदेवांनी निर्माण केलेल्या गोड स्वादिष्ट खिरीत मीठ पडू द्यायचे नाही. गुरूदेवांनी आयुष्यभर 'शुभ'चा आश्रव केला, 'अशुभ' येऊच दिले नाही.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# रक्षाबंधनानिमित्त भारतीय टपाल विभागामार्फत विशेष टपाल सुविधा उपलब्ध

नगर – यावर्षी २८ ऑगस्ट २०२६ रोजी रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने आपल्या लाडक्या भावाला प्रेमाची राखी वेळेत व सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी भारतीय टपाल विभागामार्फत विशेष टपाल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अहिल्यानगर टपाल विभागांतर्गत १ मुख्य टपाल कार्यालय, ४७ उपटपाल कार्यालये तसेच ३१४ शाखा टपाल कार्यालयांमध्ये राखी बुकिंगची सुविधा उपलब्ध आहे. नागरिकांनी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयात जाऊन राखीचे बुकिंग करून भारतीय टपाल विभागाच्या विश्वासार्ह, सुरक्षित व जलद सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

राखी सुरक्षितपणे व अखंडित स्वरूपात प्राप्तकर्त्यापर्यंत पोहोचावी यासाठी विशेष जलरोधक (Waterproof) राखी लिफाफे सर्व टपाल कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये हे लिफाफे राखीचे संरक्षण करण्यास उपयुक्त ठरतात.

रक्षाबंधनाच्या कालावधीत टपाल कार्यालयांमध्ये नागरिकांची वाढती गर्दी लक्षात घेता, शेवटच्या क्षणाची वाट न पाहता राखीचे बुकिंग लवकरात लवकर करावे, जेणेकरून देशात तसेच परदेशात राहणाऱ्या आपल्या प्रियजनांपर्यंत राखी वेळेत पोहोचू शकेल.

अहिल्यानगर टपाल विभागातील सर्व नागरिकांनी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयातून राखीचे बुकिंग करून भारतीय टपाल विभागाच्या विश्वासार्ह सेवेचा लाभ घ्यावा, तसेच देश व परदेशातील आपल्या प्रियजनांपर्यंत प्रेमाची राखी वेळेत पोहोचवावी, असे आवाहन वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर विभाग यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

# बेंगळुरू येथे 'जश्न-ए-आझादी' चे डॉ. कमर सुरूर यांना निमंत्रण



नगर – हिंदुस्तानी उर्दू मंच, बेंगळुरू व बज्मे उर्दू बेंगळुरू यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त 'जश्न-ए-आझादी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातुन नगर येथील उर्दू साहित्यिक डॉ. कमर सुरूर यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

१३ ऑगस्ट रोजी बेंगळुरू येथील एचयूएम सेंटर येथे हा कार्यक्रम होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमातून देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि हिंदी-उर्दू भाषिक संस्कृतीचा संदेश देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन बज्मे उर्दू बेंगळुरू यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

# १३ ऑगस्टपासून अहिल्यानगर ते शिर्डी पायी पालखी सोहळा

## साईदास ट्रस्टतर्फे आयोजन; ५०० साईभक्त सहभागी होणार

नगर – श्रावणमासनिमित्त श्री साईदास परिवार ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही अहिल्यानगर ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचा हा पालखी सोहळा १३ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट या कालावधीत होणार असून, सोहळ्याचे हे २३ वे वर्ष आहे. पालखी १३ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता शमी गणपती मंदिर, दिल्लीगेट येथून शिर्डीकडे प्रस्थान करणार आहे. या पालखी सोहळ्यात अंदाजे ५०० ते ५५० साईभक्त पायी शिर्डीला जाणार आहेत.

पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी सभासद फी ५०० रुपये असून, नाव नोंदणीसाठी दोन पासपोर्ट फोटो आवश्यक आहेत. चार दिवसांच्या या सोहळ्यासाठी ट्रस्टला सहकार्याची आवश्यकता असून, साईभक्तांनी यथाशक्ती अन्नधान्य किंवा आर्थिक स्वरूपात मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मदत करू इच्छिणाऱ्यांनी ट्रस्टच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्याकडून या वर्षीपासून पायी येणाऱ्या साईभक्तांसाठी चार दिवसांचा पाच लाख रुपयांचा विमा देण्यात येणार आहे. या विम्याचा लाभ घेण्यासाठी १० ऑगस्टच्या आत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन फोटो, आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक संस्थानकडे पाठविणे आवश्यक असल्याचे ट्रस्टने कळविले आहे.

पालखी सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भक्तांनी नाव नोंदणी करून सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पालखी सोहळ्याच्या नोंदणीसाठी व इतर माहितीसाठी श्री साईदास परिवार ट्रस्टचे कार्यालय, पवन नागरी पतसंस्था, कॅनरा बँकेसमोर, सर्जेपुरा, अहिल्यानगर येथे संपर्क साधता येईल. अधिक माहितीसाठी प्रकाश म्हस्के (९४२०७४७५६३), अजय काळे (९८९०६७४३४९), संजय बनसोडे (८२७५०३४१२७), शंकर बोरुडे (९८९०९५९५१६), निशीकांत शिंदे (९४२३४६४११४), लक्ष्मीकांत तिवारी (९६३७३७३७०२), विजय चौधरी (९८५०२१९१२६) यांच्याशी संपर्क साधावा. सर्व भक्तांनी पालखी सोहळ्यात सहभागी होऊन पालखीची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री साईदास परिवार ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# कोहिनूर मॉलमध्ये 'केदारनाथ' मंदिराचे उद्घाटन



नगरच्या कोहिनूर मॉलमध्ये 'केदारनाथ' मंदिराचे उद्घाटन करताना ह.भ.प. भास्करगिरी महाराज, पद्मश्री पोपटराव पवार, आमदार संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, कोहिनूर मॉलच्या संचालिका श्वेता गांधी, चित्रकार प्रकाश बोरुडे, संचालक अश्विनी गांधी, श्रीमती नीता गांधी यांच्यासह मान्यवर.

नगर –पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून अहिल्यानगर येथील कोहिनूर मॉलमध्ये उभारण्यात आलेल्या केदारनाथ मंदिराच्या भव्य आणि हुबेहूब प्रतिकृतीचे ८ ऑगस्ट रोजी अत्यंत भक्तिमय वातावरणात शानदार अनावरण सोहळा पार पडला. ह.भ.प. भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते या दिव्य प्रतिकृतीचे लोकार्पण करण्यात आले.

या सोहळ्यास पद्मश्री पोपटराव पवार, आमदार संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्यासह शहरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनानंतर बोलताना ह.भ.प. भास्करगिरी महाराज यांनी या उपक्रमाचे कौतुक करत नगरकरांना श्रावण महिन्यात प्रत्यक्ष केदारनाथ दर्शनाचा आध्यात्मिक आनंद मिळणार असल्याचे सांगितले. २५ फूट उंच आणि ४०० स्क्वेअर फूट परिसरात साकारलेली ही प्रतिकृती, मुख्य प्रवेशद्वार, गर्भगृहातील शिवलिंग, नंदीची मूर्ती, सोनेरी त्रिशूल व डमरूच्या सजावटीसह हुबेहूब केदारनाथ धामची अनुभूती देणारी ठरत आहे.

कोहिनूर मॉलच्या संचालिका श्वेता गांधी यांनी सांगितले की, पवित्र श्रावण महिन्यात भक्तीमय वातावरण असते. भक्ती आणि श्रद्धेच्या या संगमात भाविकांसाठी दिव्य अनुभूती देणारा उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. सर्व नागरिकांनी कुटुंबासह येथे येऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा.

याचबरोबर, ८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रख्यात कलाकार प्रकाश बोरुडे यांच्या १२ ज्योतिर्लिंगांवरील चित्रप्रदर्शनाचे आयोजन कोहिनूर मॉल येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनातून भाविकांना भारतीय अध्यात्माची ओळख तर होईलच, शिवाय एआय व्हिडिओच्या माध्यमातून १२ ज्योतिर्लिंगांची सखोल माहितीही अनुभवता येणार आहे. या माध्यमातून लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांना एकाच ठिकाणी केदारनाथ दर्शन, ज्योतिर्लिंगांची माहिती आणि सांस्कृतिक अनुभव घेता येणार आहे.

कोहिनूर मॉलने ग्राहकांना नेहमीच सर्वोत्तम खरेदीचा आनंद दिला आहे. यासोबतच संस्कृती संवर्धन आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. या उपक्रमातूनही त्याच परंपरेला पुढे नेण्यात येत असल्याचे कोहिनूर मॉलचे संचालक अश्विनी गांधी यांनी सांगितले.

# नवकार महामंत्र जापने आनंदधाम परिसरात अवतरले नवचैतन्य

## नवकार महामंत्राचा नियमित जाप जीवनासाठी दिशादर्शक : प्रविणऋषी महाराज


आनंद परिसरात एकाचवेळी ३० हजारांहून अधिक भक्तविकांनी ५ कोटी नवकार महामंत्र जाप केला.

नगर – आत्मकल्याण, श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेल्या अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रविणऋषी म.सा. यांच्या सान्निध्यात सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासमध्ये ९ ऑगस्टची सकाळ सर्वार्थाने अद्भूत ठरली. आनंदधाम परिसरात एकाच वेळी ३० हजारांहून अधिक भाविकांनी अतिशय श्रद्धेने जवळपास ५ कोटी नवकार महामंत्र जाप केला. अतिशय तल्लीनतेने व तालासुरात अबालवृद्धांनी या महामंत्राचा जाप करत पंचपरमेष्ठींना अभिवादन केले. आचार्यश्रींच्या पावन भूमीत या कार्यक्रमाने सकारात्मक ऊर्जेची प्रभा अवतरली. देशभरातील हजारो साधकांनी ऑनलाईन पद्धतीने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

सकाळपासूनच आनंदधाम परिसरात नवचैतन्य निर्माण झाले होते. एका ऐतिहासिक आध्यात्मिक पर्वणीत सहभागी होत असल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. आनंदतीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी म.सा., ज्ञानप्रेमविजय म.सा., पूज्य आलोकऋषी म.सा., तिर्थेशऋषी म.सा., महासती सत्यप्रभा म.सा., महासती अमितज्योती म.सा., आदी साधूसाध्वींच्या सान्निध्यात झालेल्या या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे उपसचिव सुधीरकुमार कोचर, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, महापौर ज्योतीताई गाडे, ॲड. शिवाजीराव काकडे, हर्षदाताई काकडे, उपमहापौर धनंजय जाधव, राखी बोरा, प्रमिलाबाई बोरा, पराग बोरा व बोरा परिवार, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी व कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

पूज्य उपाध्यायश्री यांच्या मार्गदर्शनात उपस्थित सर्व भाविकांनी पूर्ण समर्पणाने समग्र अर्थ समजून घेत नवकार महामंत्राचा लयबद्ध जाप केला. अनुष्ठान सांगते नंतर अभिमंत्रित झालेले पाणी उपस्थितांनी प्राशन केले.

पूज्य प्रविणऋषी म्हणाले, आयुष्यात कोणत्याही कठीण प्रसंगी अथवा चांगल्या प्रसंगात श्रद्धेने केलेला नवकार महामंत्र जाप लाभदायक असतो. नवकार महामंत्र हा जैन धर्मातील सर्वात महत्त्वाचा व मूलमंत्र आहे. पंचपरमेष्ठींना नमन करणारा हा मंत्र सर्व पापांचा नाश करणारा आणि सर्व मंगलांमध्ये प्रथम मंगल आहे. नकारात्मकता दूर करणारा आहे. मंत्र सर्व पाप कर्मे नष्ट करणारा आणि आत्म्याला शुद्ध करणारा आहे. नियमित जपामुळे मन शांत होते आणि एकाग्रता वाढते.

सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. शेवटी आचार्यश्रींच्या ध्वनीमुद्रीत मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.


कापड बाजारातील भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा चौकापर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे. समवेत आ.संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे आदी. (छाया – लहू दळवी)

# कापड बाजार रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

नगर – अहिल्यानगर शहरातील आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून बहुप्रतीक्षित कापड बाजार येथील मुख्य रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री विखे पाटील यांनी शहरातील गुंडगिरी, दहशत, अतिक्रमण आणि अवैध धंद्यांविरोधात कडक भूमिका घेत दहशतमुक्त अहिल्यानगर शहर निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, कापड बाजार हा पारंपरिक मिरवणुकीचा मार्ग असून ही एक सुप्रसिद्ध बाजारपेठ आहे. राज्यभरातून ग्राहक येथे खरेदीसाठी येतात. त्यामुळे ग्राहकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून थेट गल्लीपर्यंत विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्यासाठी वेळोवेळी शासनदरबारी पाठपुरावा केला आहे.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, स्थायी समिती सभापती पै. सुभाष लोंढे, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, मनपा महिला व बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, स्थायी समितीचे माजी सभापती गणेश कवडे, किशोर डागवले, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक निखिल वारे, विकी जगताप, संभाजी पवार, विशाल पवार, संजय ढोणे, सतीश शिंदे, ईश्वर बोरा, पुष्कर कुलकर्णी, प्रकाश भागानगरे, जालिंदर कोतकर, महेश तवले, महेश लोंढे, मनोज दुल्हम, ऋग्वेद गंधे, अजिंक्य बोरकर, सुमित कुलकर्णी, सचिन जगताप, अनिल ढवण, सुशांत जाधव, विकी वाघ, संतोष गेन्नाप्पा, नगरसेविका आशाताई डागवाले, सुनिता गेणाप्पा आदींसह व्यापारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्योजक ईश्वर बोरा यांनी केले, तर आभार प्रदर्शन नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी मानले.

